रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८७ I अंक २९० I पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

तटकरेंच्या मदतीची गॅरंटी कोण घेणार?

रसायनीत दोघे बुडाले

तीन गाड्यांचा अपघात; एक जागीच ठार

पान २ वर

रायगड, बुधवार, दि. २७ मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे

**रघुराम राजन यांची पंतप्रधान मोदींवर टीका**

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०४७ रोजी भारत विकसित राष्ट्र बनलेले असेल असे ध्येय ठेवले असून, ते मूर्खपणाचे आहे, अशी टीका रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी केली. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहत असतील, तर हे ध्येय गाठता येणार नाही. आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. पण, या मनुष्यबळाच्या हाताला काम दिले नाही, तर त्याचा काहीही पान २ वर

# मुलाने बापाला संपवलं

- क्षुल्लक कारणावर बापलेकात वाद
- रांजणपाडा येथील घटनेने खळबळ
- आईनेच दिली पोलिसात तक्रार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रागाच्या भरात स्वतःच्या बापाला किरकोळ कारणावरून मारहाण केली. त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मुंबई येथील रुग्णालयात मृत्यू झाला. ही घटना अलिबाग तालुक्यातील रांजणपाडा येथे घडली. याप्रकरणी आईने मुलाविरोधात मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार केली असून, पोलिसांनी त्याला सोमवारी दुपारी अटक केली आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल गणेश कुबल (२६) रा. रांजणपाडा असे या आरोपी मुलाचे नाव आहे. त्याला व्यायामशाळेत जाण्याची आवड आहे. त्याने व्यायामातून स्वतःचे शरीर सुदृढ ठेवले होते. प्रशिक्षकाव्यतिरिक्त तो काहीच नोकरी, व्यवसाय करीत नव्हता.

२३ मार्च रोजी दुपारी त्याची आई आरती कुबल यांच्याकडे जेवणासाठी मच्छिची त्याने मागणी केली. मात्र, आईने नकार दिल्याने तिच्यासोबत वाद घालून तो घराबाहेर पडला. रात्री घरी आल्यावर त्याची आई व वडील यांच्यामध्ये शाब्दिक वाद सुरु होते. त्यामुळे त्याने रागाच्या पान २ वर

### वडील होते एसटीमध्ये कामाला

**गणेश रामचंद्र कुबल (५२ वर्षे) रा. रांजणपाडा असे या मृत बापाचे नाव आहे. गेली १९ वर्षे ते एसटी महामंडळमध्ये वाहक म्हणून नोकरीला होते. गैरहजर असल्याने त्यांच्याविरोधात एसटी महामंडळाने बडतर्फची कारवाई केली होती. त्यामुळे ते घरीच होते. त्यांना दारु पिण्याचे व्यसन होते. सतत ते दारू पिऊन घरी येत होते. त्यामुळे पत्नीसोबत त्यांचे सतत भांडण होत असे.**

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**। महाड । वार्ताहर ।**

तालुक्यातील खर्डी गावात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर शेजारीच राहात असलेल्या एका तरुणाने अत्याचार केला. सदर आरोपीवर महाड तालुका पोलीस ठाण्यामध्ये बालकांचा लैंगिक संरक्षण अधिनियम अंतर्गत तसेच बलात्काराचादेखील गुन्हा दाखल झाला आहे.

महाड तालुक्यातील खर्डी गावात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर एकतर्फी प्रेम करत सचिन सुतार (पंदेरकर) हा त्रास देत होता. दि. २२ मार्च रोजी आरोपी सचिन सुतार याने पीडित मुलीच्या घरात घुसून अत्याचार केला. पीडित मुलीने केलेल्या तक्रारीनुसार, सचिन सुतार याच्यावर बलात्काराचा पान २ वर

## शेकापचा आज मुरुडमध्ये निर्धार मेळावा

**आ. जयंत पाटील, आ. रोहित पवार यांची उपस्थिती**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुरुडमध्ये उद्या शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील तसेच शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा बुधवारी (दि.२७) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास होणार आहे. कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी केले आहे.

मुरूड-जंजिरामधील हिंदू एज्युकेशन सोसायटी (हिंदू बोर्डिंग) विश्रामबागेच्या समोर हा मेळावा होणार आहे. यावेळी शेकापचे माजी आ. पंडित पाटील, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्रा पाटील, ज्येष्ठ नेते विजय गिदी, मुरुडचे पान २ वर

# धैर्यशील पाटलांचा पत्ता झाला कट?

## रायगडातून तटकरेंना उमेदवारी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनील तटकरेंना पुन्हा एकदा रायगड लोकसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. २६) पुणे येथे आयोजित बैठकीत अजित पवार यांनी ही घोषणा केली. त्यामुळे खासदारकीची स्वप्नं पाहणाऱ्या धैर्यशील पाटील यांचा पत्ता कट झाल्यात जमा आहे. दरम्यान, भाजपाने धैर्यशील पाटील यांना उमेदवारी मिळावी यासाठी देव पाण्यात ठेवले होते; परंतु असे असतानाही उमेदवारी मिळविण्याच्या शर्यतीत मात्र तटकरेंनी तूर्तास तरी बाजी मारल्याचे चित्र दिसून येत आहे.



भाजप-शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांची महायुती असल्याने रायगडच्या उमेदवारीचा तिढा सुटता सुटत नव्हता. त्यामुळे अंतर्गत वाद, दावे-प्रतिदावे यांनी येथील वातावरण चांगलेच तापले होते. दरम्यान, महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीचे उमेदवार म्हणून माजी केंद्रीय मंत्री तथा शिवसेना नेते अनंत गीते यांना रायगड लोकसभेची उमेदवारी जाहीर झाली असून, त्यांच्या बैठका, सभा, मेळाव्यांना कार्यकर्त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. परंतु, महायुतीत असणारे भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांनी रायगड लोकसभेवर पान २ वर

## गोगावले बोलले, मिटकरी संतापले!

### शिंदे-राष्ट्रवादीतील वाद चव्हाट्यावर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्यात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीचे सरकार व्यवस्थित चालत असताना त्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाला सोबत घ्यायला नको होते, असे वादग्रस्त विधान शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी केले होते. याविरोधात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ. अमोल मिटकरी यांनी संताप व्यक्त करीत महायुतीबाबतचा निर्णय दिल्लीवरुन झाला असून, आ. गोगावले शिवसेनेचे मालक नाहीत. त्यांनी वादग्रस्त विधान करु नये, असा टोला लगावला. त्यामुळे महायुतीतील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पान २ वर









# तटकरेंच्या मदतीची गॅरंटी कोण घेणार?

## ■ घटक पक्षातून विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह; शिंदे-राष्ट्रवादी गट आमनेसामने

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**आगामी होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत घटक पक्षातील उमेदवारांना निवडून आणण्यासाठी सुनील तटकरे मदत करतील यांची गॅरंटी कोण घेणार, असा परखड सवाल शिंदे गटाचे कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी विचारला आहे. तटकरेंनी महायुती धर्म पाळला नाही, तर आम्ही त्यांचा कडेलोट करु, असेही आमदार थोरवे यांनी स्पष्ट केले आहे.**

महायुतीचे संभाव्य उमेदवार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) माजी खासदार सुनील तटकरे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र, त्यांच्या उमेदवारीला महाड आणि कर्जत विधानसभा मतदारसंघातील आमदारांनी विरोध केला आहे. तटकरेंच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याने महायुतीमध्ये नक्कीच काही, तरी बिनसले आहे.

शिंदे गटाचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी हे एकमेकांवर राजकीय चिखलफेक करत आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत दगाफटका होण्याची संभावना त्यानिमित्ताने निर्माण झाल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाने पेण येथे जिल्हा कार्यकारिणी आढावा बैठक बोलावली होती. यावेळी कर्जतचे आ. महेंद्र थोरवे यांनी तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली. तटकरेंना आम्ही लोकसभेच्या निवडणुकीत निवडून आणण्यासाठी आम्ही मदत करु, मात्र आगामी विधानसभेच्या निवडणुकीत ते मदत करतील याची गॅरंटी कोण घेणार, त्यांच्यावर कोण विश्वास ठेवणार, असा संशय थोरवेंनी उपस्थित करत तटकरेंचा कडेलोट करण्याची भाषा केली. वरिष्ठ नेत्यांवर घटक पक्षाकडूनच शाब्दिक हल्ले केले जात असल्याने राष्ट्रवादीचे पदधिकारी सुधाकर घारे यांनी महेंद्र थोरवे यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला आहे. कडेलोट करण्याची कोणी भाषा करत असेल, तर त्याला हत्तीच्या पायाखाली चिरडून टाकू, असा पलटवार घारे यांनी केला आहे. थोरवेंना आमदारकी अपघाताने मिळाली असल्याची टीका घारे यांनी केली. महाड विधानसभा मतदारसंघातील आमदारपुत्र विकास गोगावले यांनी रायगड लोकसभेवर हक्क सांगितला आहे. त्यामुळे तटकरेंना निवडून आणण्यासाठी आमदार भरत गोगावले हे प्रामाणिक प्रयत्न करणार का, असा प्रश्न आहे. रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये कर्जत विधानसभा मतदारसंघ येत नाही. मात्र, विधानसभा निवडणुकीत थोरवेंना तटकरेंची मदत मिळणार नसल्याची खात्री वाटत असल्यानेची त्यांनी शंका उपस्थित केली आहे.



# रसायनीत दोघे बुडाले

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाण्यात बुडून दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यात मोहोपाडा आळी आंबिवली येथील शालेय विद्यार्थी गणेश विनोद चव्हाण (१४ वर्ष, २ महिने) हा मित्रांसोबत पाताळगंगा एमआयसीसी पंपहाऊसजवळील नदीपात्रात पोहण्यासाठी गेला असता पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मयत झाला. तर, जांभिवली धरणात अज्ञात इसम (वय ४० ते ४५ वर्ष) पाण्यात बुडून मयत झाला.

# द्रुतगती मार्गावर अपघात; एक ठार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दि.२५ मार्च रोजी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास मुंबई लेनवर किमी ३६.३०० येथे दूध टँकर क्र. जीजे-१८-बीव्ही ५५५९ च्या चालकाचा ताबा सुटला आणि तो कार क्र. एमएच-१४-व्हीक्यू-१०७२ वर उलटला आणि त्याच अवस्थेत घसरत जाऊन कंटेनर क्र. एमएच-४६-बीबी-९३०९ ला धडकला, त्यामुळे कंटेनरदेखील उलटला. तर, सुदैवाने कारमधील संकेत अतुल अग्रवाल (२९) आणि प्रतिक अतुल अग्रवाल (३४) दोघेही राहणार खराडी-पुणे हे बचावले आहेत. उलटलेल्या कंटेनरमधील चालक रितेश चांगदेव जगदाळे (३२) राहणार मान-सातारा हादेखील किरकोळ जखमी झालेला आहे. तर, या अपघातात टँकर चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

### जाहीर नोटीस

महसूल व वन विभाग
अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय
कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड
Email ID :altmangaon@gmail.com

जाहीर नोटीस — दावा क्रमांक: २६/२०२४

प्रति,
१. श्रीमती. आरती हरिश्चंद्र पागार
२. श्रीमती. गौरी दामू खेडेकर
३. श्री. जनार्दन गणपत पागार
४. श्रीमती. नर्मदा गोपाळ कासार
५. श्रीमती. भागीबाई विष्णू खेडेकर
६. श्रीमती. भारती हरिश्चंद्र पागार
७. श्रीमती. मालती हरिश्चंद्र पागार — अर्जदार
८. श्री. रामदास हरिश्चंद्र पागार
९. श्रीमती. लक्ष्मी कृष्णा पागार
१०. श्रीमती. वनिता कृष्णा पागार
११. श्रीमती. विमल लक्ष्मण महागावकर
१२. श्रीमती. सुजाता कृष्णा पागार
१३. श्रीमती. सुनिता राम महाडिक
सर्व रा. मालूक, ता. तळा, जि. रायगड

विरुध्द

१. श्री.प्रफुल्ल शांतीलाल शाह
२. श्री. शांतीलाल देवजी शाह — सामनेवाला
दोघेही रा. मालूक, ता. तळा, जि. रायगड

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक ०२/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वत:वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

अनुसुची

| गाव | गट नं/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| मालूक | १०१ | लागवडी योग्य क्षेत्र ४-६५-०० पोटखराब ३-४४-०० एकूण ८-०९-०० पैकी क्षेत्र २-३०-०० | २-०० |

ठिकाण:- माणगांव
दिनांक:-२२/०३/२०२४

सही/-
**(विकास गारुडकर)**
अपर तहसीलदार व
शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव

# उच्चदाब वीजवाहिनीमुळे शेतजमीन बाधित

## अनामत रक्कम, दरमहा भाडे देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कानसई नागोठणे ते डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीत ४००/२२० के.व्ही. ही उच्च वीजदाब वाहिनी नेण्याचे काम येत्या काही दिवसांत सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जागेतून ही उच्च वीज दाबाची वाहिनी जाणार आहे, त्या शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल होणार आहेत. त्यामुळे संबंधित वीजवाहिनी नदीकिनारीमार्गे नेण्यात यावी तसेच संबंधित बाधित शेतकऱ्यांना एकरकमी अनामत रक्कम व जमिनीचे दरमहा भाडे देण्यात यावे, अशी मागणी नागोठण्याजवळील पळस ग्रामपंचायत हद्दीतील पळस, शेतपळस, बाहेरशिव, वाघळी व निडी येथील शेतकऱ्यांनी रोहा तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांना यासंबंधीचे निवेदन शेतकऱ्यांनी नुकतेच दिले असून, यावेळी शिवसेना (उबाठा) रोहा तालुकाप्रमुख समीर शेडगे, नागोठणे उपविभाग प्रमुख ज्ञानेश्वर शिर्के, कोंडगावचे माजी सरपंच धर्मा भोपी, पळस शाखाप्रमुख चंद्रकांत दुर्गावले, उपशाखाप्रमुख विक्रम दुर्गावले, शशिकांत शिर्के, अजित शिर्के, हरिश्चंद्र मढवी, रामू कदम, शिवराम कदम, पळस ग्रा.पं.सदस्य सतिश डाकी, नितीन घासे चंद्रकांत बोरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे विजय विचारे, परेश विचारे, सचिन शेलार, नितीन शिर्के, गणेश म्हात्रे, सचिन बोरकर आदींसह शेतकरी उपस्थित होते.



उच्च वीज दाबाचा पुरवठा करणारी ही विद्युत वाहिनी नागोठण्याजवळील कानसई येथील उपकेंद्रातून डोलवी (ता.पेण) येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीत नेण्याचे काम प्रस्तावित आहे. ३० किलोमीटर लांबीच्या या वीजवाहिनीचे सर्वेक्षण करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नाही, असा आरोप करण्यात येत आहे. या उच्चदाब वाहिनीपासून दोन्ही बाजूकडील मोठ्या प्रमाणातील शेती बाधित होऊन नुकसान होणार आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. बाधित शेतकऱ्यांना पटविण्यासाठी गावातील पुढारी असलेल्या दलालांना ठेकेदाराकडून नेमण्यात आल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, त्यांच्याकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030807**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-76/ 2023-2024.**<br>RFx e-tender for work of providing and fixing of 200W LED Floodlights IP 65 on existing high mast towers for yard lighting at various Substation under EHV (O&M) Division Panvel**....2nd call.**<br>**Tender amount Rs. 10,51,012/-,**<br>**EMD amount Rs. 10,510/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

### जाहीर नोटीस

दि. २७/०३/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे बोपेले, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे व हिस्सा क्र. | बिनशेती प्लॉट क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| १७/४ | ११ | २६९.०० चौ.मी. | २६.९० |

ची बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेती जमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजून कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेती जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. 'मातोश्री' निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### अलिबाग नगरपरिषद अलिबाग
### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीस नुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्रं. /२०२४ दि.

| अ.क्रं. | अनुसूची | अनुसुची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन/ब्लॉक /गाळावगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकनकत्याचे नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकनकत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ८३५ C विंग/०११२६ | भाजीमार्केट, अलिबाग | दुसरा मजला, सी विंग, निवासी सदनिका क्र. ०६ | रोहीणी मनोज लाखे | अनुप अनिल गुरव व अमिता अनुप गुरव |
| २ | २ | ३३/७/०४१५८ | भाजीमार्केट, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | हितेश रामप्रकाश चटवालतर्फे अखत्यारी इम्तियाज जहांगीर सय्यद | जमीर मोहम्मद रज्जब व मुस्कान जमीर रज्ज्ब |
| ३ | २ | १५९७/अ/०१९११ | ब्राह्मण आळी, अलिबाग | तळ मजला, निवासी सदनिका क्र.३ | सचिनचंद्र जनार्दन राणे | सचिन कमळाकर म्हात्रे |
| ४ | २ | २०००/५/०४३५८ | श्रीबाग नं.२, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०१ | मे.ए.कॉर्प तर्फे पार्टनर वरुन मयूर अजमेरा | सुशिल वी साखरे व पद्माबाई डब्ल्यू साखरे |
| ५ | ३ | १०५८/०१३६३ | एस.टी.स्टॅण्ड, अलिबाग | तळमजला, गाळा क्र. ०३ | विणा निखील इंगळे | गौरी मधुकर राऊळ व मंदार मधुकर राऊळ |
| ६ | २ | १८०३/Aविंग/०२१३१ | कलेक्टर ऑफीस अलिबाग, | दुसरा मजला, अे विंग निवासी सदनिका क्र. ६ | यशवंत विठ्ठलराव कदम | सुचिता काशिनाथ साळवी |
| ७ | २ | ३३१३/०४१५४ | जुना भाजी मार्केट, अलिबाग | तळ मजला, निवासी सदनिका क्र. जी-३ | हितेश चटवालतर्फे कबुलीजबाबाकरिता अखत्यारी इम्तियाज जहांगीर सैय्यद | असीफ उस्मान दणदणे |
| ८ | २ | ७५४/Bविंग/०३६४४ | बाजारपेठ, अलिबाग | तळमजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. ३ | गनी तमीज बागवान | बिरेंद्र चंद्रबली राय व विवेक विरेंद्र राय |
| ९ | २ | ११३०/०१३९९ | मारुतीनाक्याजवळ अलिबाग | तळमजला, व्यापारी गाळा क्र. ४ | निलेश सिताराम भगत | संपदा सुजय पाटील |
| १० | २ | ५०३/ब अे विंग/ ०६६६ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, निवासी सदनिका क्र.१, अलिबाग | व्ही.पी.कन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर विलास आत्माराम पाटील | जनार्दन गोपीनाथ पाटील |
| ११ | २ | ९९२/८/०४७७८ | मारुतीनाक्याजवळ, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०२ | मे दिपम बिल्डर्स अँड डेव्हलपर्सतर्फे पार्टनर मोहनीश दिलीप जोग व दिपा दिलीप जोग | निता गिरीश कटारिया |
| १२ | २ | ८९२/११/०४८३८ | मारुतीनाक्याजवळ, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०२ | मे दिपम बिल्डर्स अँड डेव्हलपर्सतर्फे पार्टनर मोहनीश दिलीप जोग व दिपा दिलीप जोग | कविता चेतन जैन व चेतन पारसमल जैन |
| १३ | २ | ११३१/०१४०० | मारुतीनाक्याजवळ, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | नितीन विनायक शिंपी व अस्मिता नितीन शिंपी | विजया प्रफुल्ल घोडिंदे |
| १४ | २ | १०७७Bविंग/१६ ०४७६२ | पागाची गल्ली, अलिबाग | चौथा मजला, बी विंग निवासी सदनिका क्र. ४०१ | मे मधुर एंटरप्रायझेसतर्फे भागीदार देवांग हरिदास ठक्कर | जागृती नारायण चुनेकर |
| १५ | २ | ११०४/Eविंग/ ०३६०४ | मारुतीनाक्याजवळ, अलिबाग | पहिला मजला, ई विंग, निवासी सदनिका क्र.२०३ | निता सतिश ठक्कर | राजेश अनंत पाटील |
| १६ | २ | १५८९/अ/c विंग ०४८६० | ब्राह्मण आळी, अलिबाग | तिसरा मजला, अे विंग, निवासी सदनिका क्र.३०२ | मे रसिका कंन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकरतर्फे कबुली जबाबाकरिता अखत्यारी मनाली भरत माळी | निखिल दिपक लिमये, दिप्ती दिपक लिमये व दिपक मधुसूदन लिमये |
| १७ | २ | १४८३Dविंग/०४०९३ | स्टेट बँकेजवळ, अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र. D-४०२ | मे इनामोर रिअॅल्टी प्रायव्हेट लि तर्फे डायरेक्टर अशोक छगनलाल ठक्करतर्फे कबुलीजबाबाकरिता अखत्यारी समीर सुरेश विचारे | सचिन लक्ष्मण बैकर व दिप्ती सचिन बैकर |
| १८ | ३ | ४२६/००५१५ | ठिकरुळ नाक्या जवळ,अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. (१०२)१०७ | दिपक मोरेश्वर रावते | प्रतिभा दिपक रावते |
| १९ | २ | ५०८/अ/अे विंग/ ००६७७ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, व्यापारी गाळा क्र. ६ | मधुसूदन काशिनाथ नाईक व यांचे कुलअखत्यारी डेव्हलपर्स श्री. भगवान रघुनाथ मालपाणी | हिराचंद गणेशमल जैन |
| २० | २ | ५०८/अ/अे विंग/ ००६७७ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, व्यापारी गाळा क्र.७ | मधुसूदन काशिनाथ नाईक यांचे कुलअखत्यारी डेव्हलपर्स श्री. भगवान रघुनाथ मालपाणी | ललिता हिराचंद जैन |
| २१ | २ | १५९०/००४१२३ | रामनाथ रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०४ | सुनिता विजय सोनटक्के, सागर विजय सोनटक्के व सौरभ विजय सोनटक्के | वैजयंती अनिल डोंगरे व अनिल अनंत डोंगरे |
| २२ | २ | १११५/०१३९० | मारुतीनाक्याजवळ, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०२ | हाफिजुल्ला इब्राहिम दांडेकरच्या तर्फे दस्तऐवज प्रवेशासाठी कु.मु.नौसीन हाफिजुल्ला दांडेकर | विनायक बाळकृष्ण थळकर |
| २३ | २ | ३९४/०५०८६ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | ऑफीस नं. ३ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २४ | २ | ३९४/०५०८७ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | सदनिका क्र. ४०२ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २५ | २ | ३९४/०५०८७ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | पहिला मजला, ऑफीस नं. ५ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २६ | २ | ३९४/०५०८७ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | सदनिका क्र. १०२ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २७ | २ | ३९४/०५०८७ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | सदनिका क्र. ३०१ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २८ | २ | ३९४/०५०८७ | ठिकरुळ नाक्या -जवळ,अलिबाग | सदनिका क्र. १०१ | ॲपेक्स इंजिनिअरींग ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार वर्षा मिलिंद म्हात्रे व चारुशिला तुकाराम म्हात्रे | कुंदा बळीराम मिस्त्री |
| २९ | ३ | ५४६/अ/००७२७ | चेंढरे, अलिबाग | घर | श्रीमती हिराबाई धर्मा महाले | सुरेंद्रा धर्मा महाले |
| ३० | २ | ९१७अ/००४९३२ | मिरचीगल्ली अलिबाग | सदनिका क्र. ३०३ | प्रशांत यशवंत दिवेकर | अशोक शांताराम प्रधान अनया अशोक प्रधान |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

पान १ वरून

# मुलाने बापाला संपवलं

भरात घरातील जेवणाचे टोप घराबाहेर फेकून दिले. त्यावेळी त्याच्यासोबत वडिलांशी वाद सुरु झाला. हा वाद विकोपाला गेला. त्याने वडिलांना हाताबुक्क्याने मारहाण करण्याबरोबरच त्यांच्या जोरदार कानाखाली मारली. या मारहाणीत ते लादीवर पडून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दुसऱ्या दिवशी त्यांना उलट्या झाल्या. त्यामुळे त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, अधिक उपचारासाठी मुंबई येथील जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले. रुग्णालयात उपचार सुरू असताना २५ मार्च रोजी धुळीवंदनाच्या दिवशी रात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. पतीच्या मृत्यूला मुलगा कारणीभूत ठरल्याचा आरोप करीत आरती कुबल यांनी कुणालविरोधात मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास गुन्हा नोंदविण्यात आला असून, कुणालला पोलिसांनी अटक केली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.व्ही. लांडे करीत आहेत.

# मुलीवर बलात्कार

तसेच पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी सचिन सुतार याच्यावर गुन्हा दाखल झाला असून, महाड तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.पी. गायकवाड हे अधिक तपास करीत आहेत.

# शेकापचा आज मुरुडमध्ये निर्धार मेळावा

शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे. या मेळाव्यात आ. जयंत पाटील तसेच आ. रोहित पवार यांचे प्रमुख मार्गदर्शन असणार आहे.

# विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे

उपयोग होणार नाही. त्यामुळे भारताला सर्वात आधी या मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना काम करण्यासाठी तयार करावे लागेल आणि त्यानंतर त्यांना रोजगारही उपलब्ध करून द्यावा लागेल, असे रघुराम राजन यांनी स्पष्ट केले.भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी भारताच्या प्रगतीबाबत सध्या जो डंका पिटवला जातोय, त्याबद्दल काळजी व्यक्त केली. अशा अवाजवी जाहिरातीमुळे खरी प्रगती झाकोळली जाते, असेही ते म्हणाले. भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात होत आहे, असा विश्वास निर्माण करून त्याची मोठ्या प्रमाणात जाहिरात करण्यात येत आहे. अशी जाहिरात करून भारत सर्वात मोठी चूक करत आहे. सर्वप्रथम भारताला महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करावे लागेल, त्यानंतरच भारत शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे जाऊ शकतो, असे प्रतिपादन रघुराम राजन यांनी केले आहे.

# धैर्यशील पाटलांचा पत्ता झाला कट?

त्यांना सोबत दावेदारी केल्याने उमेदवारीचा तिढा वाढला होता. परंतु, आता राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने पहिला उमेदवार म्हणून रायगड लोकसभा मतदारसंघातून मा. खा. सुनील तटकरे यांच्या नावाची घोषणा केली आहे. दरम्यान, वर्षभरापूर्वी पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांना रायगडमधून लोकसभेवर उमेदवार देण्याचा शब्द भाजप श्रेष्ठींनी दिल्याचे सांगितले जाते. तेव्हापासून धैर्यशील पाटील आणि भाजपने प्रचाराला सुरुवात केली. मात्र, अजित पवार सत्तेत सहभागी झाल्याने सर्वच गणित बिघडले. धैर्यशील पाटील यांनी मागील सहा महिन्यांपासून सभा, मेळावे आणि बैठका घेऊन रायगडावर आपला दावा मजबूत केला होता. परंतु, आज अजित पवार गटाने रायगडचा उमेदवार म्हणून सुनील तटकरेंचे नाव जाहीर केल्याने खासदार होण्याची स्वप्नं पाहणाऱ्या धैर्यशील पाटील यांचे मनसुबे धुळीस मिळालेत, अशी चर्चा सुरू आहे.

# गोगावले शिवसेनेचे मालक नाहीत

दरम्यान, आ. मिटकरी म्हणाले, गोगावले यांनी रायगड लोकसभेच्या किंवा महाराष्ट्राच्या अनुषंगाने काय प्रतिक्रिया दिली हे पाहावे लागणार आहे. कार्यकर्त्यांची समजूत करण्यासाठी असे विधान केले, की मनापासून ही प्रतिक्रिया दिली हेदेखील समजून घेतले पाहिजे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीने एकत्र यावे, हा निर्णय दिल्लीवरून अमित शहा, नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे. त्यामुळे भरत गोगावले हे शिवसेनेचे मालक नाहीत. हा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी घेतलेला आहे. शिवसेनेला जशी अडचण वाटत होती, त्यानुसार यांना सोबत घेणेदेखील अडचणीचे असल्याचे त्यावेळी बोललो होतो, अशा प्रकारचे विधान जाणीवपूर्वक करणे गोगावले यांनी टाळावे, असे अमोल मिटकरी यांनी स्पष्ट केले.

निवडक

## दुर्मिळ नाण्यांचे प्रदर्शन

**पनवेल :** नेहमीच विविध उपक्रम आयोजित करणाऱ्या लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे होलिकोत्सवाच्या निमित्ताने कृष्णा गार्डन सोसायटी, नवीन पनवेल येथे दुर्मिळ नाणी आणि स्टॅम्प यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ज्येष्ठ लायन सभासद यशवंत ठाकरे आणि बंसिधर गैरोला यांचे हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विजय मनोहर यांनी संग्रह केलेली ६०० पेक्षा जास्त दुर्मिळ नाणी आणि १००० पेक्षा जास्त तिकिटे यावेळी प्रदर्शित करण्यात आली होती.

## एटीएममधून पैसे चोरले

**पनवेल :** बोलण्यामध्ये गुंतवून स्वतःकडे एटीएम दिले आणि एक लाख रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अथर्व काळभोर याने एटीएममधून पैसे काढण्याचा प्रयत्न केला मात्र ते निघाले नाही. त्यानंतर अज्ञात इसमाने बोलण्यामध्ये गुंतवून अथर्व याला पैसे काढण्याचा प्रयत्न करण्यास सांगितले.अज्ञाताने पिनकोड बघून त्याच्याकडे असलेले एटीएम अथर्व यास दिले आणि बँकेच्या खात्यातून पैसे काढले.

## मद्यविक्री करणाऱ्यावर गुन्हा

**पनवेल :** अवैधरित्या मद्याच्या बाटल्या विक्री करण्यासाठी बाळगल्याप्रकरणी लक्ष्मण साकेत यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साईकृपा ढाबा, सेक्टर १२, कामोठे येथे लक्ष्मण साकेत दारू विक्री करत असल्याची माहिती कामोठे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कामोठे पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी लक्ष्मण साकेत याच्याकडे हजारो रुपयांच्या प्लास्टिकच्या मद्याच्या बाटल्या सापडून आल्या.

## ग्रामस्थांकडून अभिनंदन

**खांब:** नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे या विद्यालयाच्या स्वच्छता अभियान उपक्रमातील सुयशाबद्दल धानकान्हे ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात आले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात श्रमिक विद्यालय चिल्हे या विद्यालयाने अभियानात संपूर्ण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून संस्था व विद्यालयाच्या नावलौकिकात अधिकच भर घातली. संस्था व विद्यालयाच्या कामगिरीवर प्रभावित होऊन येथील धानकान्हे ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## पाथरशेत येथे शिक्षण परिषद

**सुतारवाडी :** रा. जि. प. शाळा पाथरशेत ता.रोहा येथे मासिक शिक्षण परिषद कुडली केंद्रप्रमुख उमेश महाडेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. राजश्री पाखरे यांनी समग्र प्रगती पुस्तक, अविनाश पाटील यांनी सीसीई मार्गदर्शन, प्रतीक्षा बडे यांनी स्थानिक गरजेनुसार विषय , राजेंद्र भोर यांनी व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.सदरील शिक्षण परिषदेस कुडली केंद्रप्रमुख आणि शिक्षक उपस्थित होते.

### निवडणुकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता

# कर्मचाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

निवडणुकीच्या कामासह मतदानावर बहिष्कार न टाकण्याचे आवाहन करीत आचारसंहिता संपल्यावर प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करू असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले. एसटी कर्मचाऱ्यांसोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर कर्मचारी मतदानावर बहिष्कार टाकणार नाही, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

एसटी महामंडळ रायगड विभागात तीन हजारहून अधिक कर्मचारी काम करीत आहेत. त्यामध्ये दीड हजारहून अधिक चालक व वाहकांची संख्या आहे. आपत्कालीन परिस्थितीत रात्रीचा दिवस करीत एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना सेवा दिली आहे. निवडणुकीच्या काळात कर्मचाऱ्यांसह मतपेट्यांची ने - आण करणे. कोरोना काळात परराज्यातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या राज्यात सुखरूप पोहचविण्याची कामगिरी प्रामाणिकपणे बजावली आहे.



(छायाचित्र : समीर मालोदे)

> एसटी कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू व्हावा यासाठी गेल्या अनेक वर्षापासून लढा दिला जात आहे. सरकारकडून फक्त आश्वासने दिली जात आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे निवडणुकीच्या कामासोबत मतदानावरही बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र जिल्हाधिकारी यांच्या समवेत सकारात्मक बैठक झाली. आचारसंहिता संपल्यावर तातडीने प्रश्न मार्गी लावण्यासाठी वरिष्ठ पातळीवर बैठक घेण्याचा प्रयत्न करू असे जिल्हाधिकारी रायगड यांनी सांगितले आहे.
>
> –प्रसन्न पाटील – सचिव , शिवशक्ती युनियन, एस कर्मचारी

रायगड जिल्ह्यात दिवसाला एक लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करीत असून सुमारे ३५ लाखाहून अधिक एसटीला उत्पन्न मिळवून देण्याचे काम केले जाते. उत्पन्न वाढीसाठी एसटी कर्मचारी काम करतात. तरीदेखील हे कर्मचारी उपेक्षित राहिले असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केल आहे. वेतन वाढीसह सातवा वेतन आयोग मिळावा यासाठी गेल्या अनेक वर्षापासून एसटी कर्मचारी लढा देत आहेत. गेल्या दहा वर्षापासून कामबंद आंदोलन, संप, मोर्चे काढून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र सरकारकडून फक्त आश्वासने देण्यात आली आहेत. पालकमंत्री उदय सामंत यांनीदेखील आश्वासन दिले होते. परंतु त्या आश्वासनाची पुर्तता करण्यास सरकार उदासीन ठरल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेत तसेच मतदानावरही बहिष्कार टाकण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला होता. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पुढाकार घेत त्यांच्या दालनात मंगळवारी एसटी कर्मचाऱ्यांना बोलावण्यात आले. यावेळी त्यांचे गाऱ्हाणे ऐकून घेतले. निवडणुकीच्या काळात कोणतेही आश्वासन देता येत नाही. मात्र निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आचारसंहिता संपल्यावर तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल. वरिष्ठ पातळीवर याबाबत सांगून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करू असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

# विना परवाना जाहिरात करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**| पनवेल | वार्ताहर |**

लोकसभा निवडणुकीमुळे राज्यात सर्वत्र आचारसंहिता लागू आहे. विना परवानगी कोणत्याही राजकीय पक्षांनी जाहिराती करु नये असे स्पष्ट आदेश निवडणूक आयोगाचे असताना सुद्धा कामोठे येथे राजकीय संदेश देणाऱ्या भिंती रंगविण्यात आल्या होत्या. नागरिकांनी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या ॲपवर केलेल्या तक्रारीनंतर ही बाब उजेडात आली.

काही मिनिटांत मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेत अनोळखी राजकीय कार्यकर्त्यांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात आचारसंहिता भंग केल्याबाबत तसेच महाराष्ट्र महापालिका मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला.

कामोठे येथील सेक्टर ३४ मधील कुपणाच्या भिंतीवर फिरसे एकबार मोदी सरकार असा संदेश लिहून त्याशेजारी कमळाचे चिन्ह काढले होते. कामोठेच्या दक्ष नागरिकांनी याबाबत सिव्हीजील ॲपवर निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्यावर मावळ लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दिपक सिंघला (पी.एम. आर.डी.ए.चे अतिरिक्त आयुक्त) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके (उपविभागीय अधिकारी पनवेल) यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक आयोगाने नेमलेले पथक काही मिनिटांत घटनास्थळी पोहचले.

> ३३ मावळ लोकसभा मतदार संघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात येणार असून, आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई तसेच संबंधीत अधिनियमान्वये गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.
>
> –राहुल मुंडके, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मावळ मतदारसंघ

भिंतीवरील राजकीय संदेश पुसून टाकण्यात आला आणि कामोठे पोलीस ठाण्यात संदेश लिहिणाऱ्या अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.


आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये या करिता मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा क्षेत्रात ६ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. नागरिकांना सिव्हीजील ॲपव्दारे आचारसंहिता भंग झाल्यास तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तक्रारीनंतर १० मिनिटांत निवडणूक आयोगाचे पथक घटनास्थळी भेट देणार तसेच पुढील ९० मिनिटांत या तक्रारींवर कारवाई करुन त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला देणार आहे. या प्रकरणात कामोठे पोलीस ठाण्यात महाराष्ट्र मालमत्ता विरूपनास प्रतिबंध अधिनियम १९९५ चे कलम ३ व महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ अन्वये दाखल करण्यात आली आहे.

# रस्त्यावरील साईडपट्टी धोकादायक

**| कोर्लई | वार्ताहर |**

मुरूड-आगरदांडा रस्त्यावर शेगवाडा ते वसंतराव नाईक महाविद्यालय रस्त्यादरम्यान डांबरीकरण करण्यात येत असून या रस्त्यालगत साईडपट्टी भरण्यात न आल्याने, खड्डा तयार झाल्याने वाहनचालकांची डोकेदुखी वाढली असून वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन याठिकाणी साईडपट्टी तातडीने बुजविण्याची मागणी जोर धरत आहे.



साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याचे डांबरीकरण कामाला जोमाने सुरुवात झाली असून मुरुड - आगरदांडा रस्त्यावर शेगवाडा ते वसंतराव नाईक महाविद्यालय दरम्यान डांबरीकरण करण्यात आले असून या ठिकाणी साईडपट्टीला जवळपास एक फुटाचा खड्डा तयार झाल्याने वेळप्रसंगी या ठिकाणी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून येथील रस्त्यालगतची साईडपट्टी तातडीने पूर्ण बुजविण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. आमच्या प्रतिनिधीने सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी याठिकाणी रस्त्यावरील साईडपट्टी लवकरात लवकर बुजविण्यात येतील, असे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## भुसा भरलेल्या गोणी रस्त्यावर

**| पनवेल | वार्ताहर |**

तूरडाळीचा भुसा भरलेल्या गोणी रस्त्यावर पडल्याची घटना पनवेल-जेएनपीटी महामार्गावर घडली. पळस्पेकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या ट्रकमुळे झालेली वाहतूककोंडी वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे दूर झाली आहे.पळस्पेकडून जेएनपीटीकडे जाणारा ट्रकमध्ये तुरडाळीचा भुसा भरलेल्या गोणी होत्या. त्यातील काही गोणी रस्त्यावर पडल्याने काही काळासाठी या महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. याबाबतची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी त्वरित पोहचले व त्यांनी सदरचा ट्रक तसेच रस्त्यावर पडलेल्या गोणी एका बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

## नाईक-अंतुले महाविद्यालयात

# मतदान जनजागृती रॅली

**| म्हसळा | वार्ताहर |**

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी म्हसळ्यात जनजागृती होण्यासाठी प्रशिक्षण, प्रसार, प्रसिद्धी व जनजागृतीचा कार्यक्रम आज व्हीएनसी कॉलेज, अंजुमन हायस्कूल येथे प्रांत डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

मतदार नागरिकांची नोंदवही, प्रत्यक्ष मतदान, मतमोजणी, चिठ्ठयांची मोजणी ही सर्व प्रात्यक्षिके व नागरिकांच्या शंका दूर करण्यात आल्या. लोकशाहीप्रधान भारत देशात आपल्या हक्काचे सरकार निवडुन आणण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.



वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी समजून त्वरित आपले नाव मतदार यादीत नोंदविण्याचेही आवाहन समीर घारे यांनी केले. यावेळी तालुक्यातील विद्यार्थ्यांचे १८ वर्षे पूर्ण असल्याने नमुना नं.६ चे फॉर्म भरुन घेतले. तसेच उर्वरित विद्यार्थ्यांना माहिती देऊन फॉर्मचे वाटप करण्यात आले.

नवमतदारांनी फक्त मतदार म्हणून नोंदणी न करता प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत भाग घेऊन योग्य उमेदवाराला मतदान केले पाहिजे असे कार्यक्रमादरम्यान सूचित करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार समीर घारे, निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, महसूल तहसीलदार धर्मराज पाटील, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले, प्राचार्य दिगंबर टेकळे आदी मान्यवर उपस्थित होते.

> लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नव्याने वापरण्यात येणाऱ्या ईव्हिएम– व्हिव्हिपॅट मशिनचे आज झालेले प्रात्यक्षिक प्रत्यक्ष वापर, समज–गैरसमज पूर्णपणे दूर झाले. केलेले मतदान ईव्हिएम–व्हिव्हिपॅटमध्ये नोंदले गेल्याची खात्री केली.
>
> – साक्षी सुनिल आंजर्लेकर, विद्यार्थिनी

# रखडलेल्या समस्यांचा निवडणुकीवर परिणाम?

■ माथेरानच्या जनतेमध्ये अनुत्साह

**| माथेरान | वार्ताहर |**

लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून सर्वच राजकीय पक्षांमध्ये उमेदवारीसाठी चढाओढ दिसून येत आहे. मागील पाच वर्षांमध्ये जनतेशी एकरूप राहिलेले खासदार यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळत आहे पण काही ठिकाणी खासदारकीच्या काळामध्ये जनतेशी फटकून वागलेल्या उमेदवारांना मात्र यावेळी पुन्हा निवडून येण्याकरता कसरत करावी लागणार हे निश्चित आहे व याचे पडसाद सध्या माथेरानमध्ये पहायला मिळत आहेत.



मावळ मतदार संघामध्ये माथेरानचा समावेश होतो. मागील पाच वर्षांमध्ये माथेरानचा पर्यटन विकास थांबला आहे. पाच वर्षात येथे पर्यटनपूरक एकही प्रकल्प राबविला गेला नाही. जी काही विकासकामे या काळामध्ये झाली, ती या आधीच्या सरकारने मंजूर केलेली होती. नवीन सरकारने माथेरानसाठी कोणत्याही पर्यटनपूरक योजना राबविलेल्या नाहीत. माथेरानकरांच्या माफक अपेक्षा आहेत. येथे रस्ता, वीज, पाणी सारख्या मूलभूत सुविधा निरंतर सुरू राहाव्यात. परंतु, माथेरानला गरज असलेला पर्यायी रस्ता, पाणी दरामध्ये कपात व वीज दरामध्ये कपात या सारखे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. माथेरानच्या पर्यटनामध्ये महत्त्वाचा असणारा वाहनतळ प्रश्न मागील दहा वर्षापासून प्रलंबित आहे. महत्त्वाच्या प्रकल्पास कोणाकडूनही ठोस पाठबळ मिळाले नव्हते. ज्यामुळे येथील जनता दुखावलेली आहे. इतर पर्यटनस्थळांच्या बाबतीत शासनाने दाखवलेला उदारपणाचा हात माथेरानकरांसाठी आखडता घेतला आहे. त्यामुळे माथेरानचे पर्यटन जैसे थे आहे. त्यामुळेच येणाऱ्या आगामी निवडणुकीकरता माथेरानमधील मतदारांमध्ये उत्साह नसल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे राज्यांमध्ये सुरू असलेल्या पक्षफुटीच्या राजकारणाचा मोठा परिणाम येथील पक्षांवर झाला असून नेत्यांकडून कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता सुरू असलेल्या पक्ष बदलाच्या भूमिकेमुळेही सामान्य कार्यकर्ता निवडणुकीपासून दूर जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## दागिन्यांसह पिस्तुल केले हस्तगत

**| पनवेल | वार्ताहर |**

कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत कोबिंग ऑपरेशन व ऑल आउट ऑपरेशन राबविण्यात आले. त्यामध्ये कळंबोली पोलिसांनी सोन्याच्या दागिन्यांसह देशीबनावटीचे पिस्तुल व तलवार हस्तगत केले आहे. अरबाज शेख यांच्या ताब्यातून ३०,००० रूपये किंमतीचे देशी बनावटीचे मॅगझीन असलेले स्टील धातुचे १ पिस्तुल व ३००० रूपये किमतीची ३ पितळी जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. अश्वीन सुर्यवंशी यांचेकडुन १९ इंच लांबीची तलवार हस्तगत करण्यात आली आहे. अरमानसिंग रंधवा यांच्याकडुन एकूण १,२६००० रूपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

# नागोठणे पोलिसांची कार्यतत्परता

■ भिसे खिंडीतील रस्ता झाला मोकळा

■ स्थानिकांच्या मदतीने पडलेले झाड हटविले

**| नागोठणे | वार्ताहर |**

नागोठणे-रोहा मार्गावरील भिसे खिंडीतील वळणदार रस्त्यावर मधोमध कोसळलेले झाड स्थानिक नागरिकांच्या मदतीने हटविण्याचे काम नागोठणे पोलिसांनी केले आहे. नागोठणे पोलीस ठाण्यातील वाहतूक शाखेने दाखविलेल्या कार्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



नागोठणे-रोहा मार्गावर नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भिसे खिंडीत एका नागमोड्या वळणावर पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास एक महाकाय वृक्ष कोसळल्याची माहिती नागोठणे पोलीस ठाण्याला मिळाली. त्यानुसार नागोठणे पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक हरेष काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रपाळीच्या कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने रस्त्यावर पडलेल्या झाडाच्या फांद्या तोडून ते झाड रस्त्याच्या बाजूला करण्यात आले. नंतर सकाळी साधारण ६.२० वाजण्याच्या सुमारास नागोठणे रोहा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाला. त्यामुळे सकाळी नागोठणे व रोहाकडे जाणाऱ्या वाहनचालकांना कोणताही त्रास झाला नाही.

### निर्जीव भिंती बोलू लागल्या ; पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी राबवला उपक्रम

# भिंतीवरील चित्रातून माथेरानमध्ये स्वच्छतेची जनजागृती

**| माथेरान | वार्ताहर |**

माथेरान पर्यटनस्थळी स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी निर्जीव भिंतींवर स्वच्छतेविषयी चित्र रेखाटून आणि सुविचाराने भिंती बोलक्या केल्या जात आहेत. माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने हा उपक्रम सुरू करून स्थानिकांना तसेच येणाऱ्या पर्यटकांना स्वच्छतेचा संदेश दिला आहे.

माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्याने स्वच्छता करण्यासाठी मनुष्यबळाचा वापर केला जातो. एकूण ५४ किलोमीटरच्या परिघामध्ये मनुष्यबळावर स्वच्छता करणे शक्य नसल्याने नगरपालिकेकडून भिंतीवर चित्र रेखाटून स्वच्छतेविषयी जनजागृती केली जात आहे. वीर हुतात्मा भाई



कोतवाल विद्यामंदिर, उद्याने, घरांच्या भिंती, दुकानाच्या भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारे चित्र रेखाटून निसर्ग आपला सोबती असल्याचे सुविचार लिहून जनजागृती केली जात आहे. माथेरानमध्ये आलेले पर्यटक त्यांच्याकडील पाण्याच्या रिकाम्या बाटल्या व खाण्यासाठी आणलेल्या पदार्थांवरील प्लास्टिकचे रॅपर कचराकुंडीत न टाकता नकळतपणे जंगलात किंवा रस्त्यावर टाकतात त्यांनी तसे न करता पालिकेच्या कचराकुंड्यांचा वापर करावा,असे आवाहन माथेरान गिरिस्थान नगर परिषदेने केले आहे.



> माथेरानमध्ये स्वच्छतेसाठी भिंतींचा उपयोग करून जनजागृती करीत आहोत.सर्व पॉईंट्सवर कचराकुंड्या बसवलेल्या आहेत .हे पर्यटनस्थळ आपले स्वतःचे समजूनच कचरामुक्त ठेवा. पर्यावरण मित्र बनून आपण साऱ्यांनी कचरामुक्त माथेरान करूया. - राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी,माथेरान

> पालिका स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते. हे सर्वश्रुत आहे. कारण माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्याने मनुष्यबळ वापरून कचरा संकलित केला जातो. पण सगळीकडे कर्मचाऱ्यांना पोहोचणे शक्य होत नाही. त्यामुळे कचरामुक्त माथेरान करण्यासाठी पालिकेकडून भिंतीचित्राद्वारे जनजागृती केली जात आहे. तसेच पॉईंटवर असलेल्या दुकानदारांनी स्वतःची कचराकुंडी ठेवून कचरामुक्त माथेरानसाठी हातभार लावला आहे.
>
> - संजय शिंदे, दुकानदार,इको पॉईंट

# मोरबे धरणात ४९ टक्के जलसाठा

**| पनवेल | वार्ताहर |**

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात मात्र ४९ टक्क्यांपेक्षा अधिक जलसाठा आहे. नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात अद्याप पुढील १३७ दिवस पुरेल एवढा जलसाठा आहे. नवी मुंबईकरांना मात्र १० ऑगस्टपर्यंत सुरळीत पाणीपुरवठा करता येईल एवढा पाणीसाठा मोरबे धरणात शिल्लक आहे. तरीदेखील नवी मुंबईकरांनी पाण्याचा वापर जपून करावा असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

महापालिकेच्या मालकीचे मोरबे धरण २४ सप्टेंबर २०२३ रोजी १०० टक्के भरले व धरणातून १९.०८७ क्युबिक मीटर पाण्याचा विसर्गही करण्यात आला होता. महापालिकेच्या लोकसंख्येच्या मानाने धरणातून अधिक पाणी उपसा केला जात आहे.

महापालिकेने अर्थसंकल्पातही भिरा कुंडलिका प्रकल्पातील तसेच नवीन पाणीस्रोत निर्माण करण्याकडेही नियोजन केले आहे. तसेच पालिका सिडकोकडून १० एमएलडी पाण्याची देवाणघेवाण करण्याच्या तयारीत आहे. महापालिकेला एमआयडीसीकडून मिळणार हक्काचे ८० एमएलडी पाणी मिळत नसून आजघडीला ते फक्त ७० एमएलडीपर्यंत मिळत असल्याने पालिकेच्या हक्काचे जवळजवळ १० एमएलडी अतिरिक्त पाणी शिंदे मिळवून देतील अशी आशा आहे. महापालिकेने पाणी वितरण व्यवस्थेबाबत व मोरबेतील पाणी उपशाबाबत दिवसाला धरणातून ४५० दशलक्ष लिटर पाणी उपसा एवढेच पाणी घेतले जाण्यावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे.

# गुऱ्हाळ आणि गोंधळ

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची प्रक्रिया सुरू झाली. तरीही सर्वच पक्षांच्या चर्चांची गुऱ्हाळे चालू आहेत. कोणाला किती जागा मिळणार याबाबत निश्‍चिती झालेली नाही. यामध्ये महाविकास आघाडीत किती घोळ आहेत हे पाहा असे चित्र माध्यमांमधून रंगवले जात असते. पण निदान महाराष्ट्रात तरी महायुतीत जेवढा गोंधळ आहे तितका आघाडीतही नाही. भाजप, शिंदे गट आणि अजितदादा यांची निवडणुकीची तयारी गेल्या जवळपास तीन महिन्यांपासून चालू आहे. त्यामुळे युतीचे जागावाटप चुटकीसरशी होऊन जाईल असा देखावा तयार झाला होता. पण आता एकेका जागेवरून ज्या हाणामाऱ्या सुरू आहेत त्या पाहून, जब रात है ऐसी मतवाली, तो सुबह का आलम क्या होगा असा प्रश्‍न उपस्थित झाला आहे. प्रत्येकाने गेल्या वेळच्या आपापल्या जागा लढवाव्यात हे सूत्र शिंदे आणि भाजप हे दोनच गट असेपर्यंत ठीक होते. पण अजितदादांचा प्रवेश झाल्यापासून हे समीकरण बिघडले आहे. कारण, गेल्या वेळी राष्ट्रवादी हा युतीच्या विरोधात होता. त्यातही अजितदादांना ज्या जागा लढवायची सर्वाधिक इच्छा आहे त्यापैकी, बारामती, सातारा आणि शिरुरचे खासदार शरद पवारांसोबत आहेत. रायगडच्या खासदारांना शिंदे गट आणि भाजप या दोहोंचा कडवा विरोध आहे. लोकसभेच्या तिकिटाच्या आश्‍वासनाने भाजपमध्ये गेलेल्या एका नेत्यांची पंचाईत झाली आहे. पण ही पंचाईत राज्यव्यापी आहे. नांदेडमध्ये अशोक चव्हाणांना त्यांचे कडवे प्रतिस्पर्धी प्रतापराव चिखलीकर यांचा प्रचार करीत फिरावे लागणार आहे. बीडमध्ये पंकजा मुंडे यांना इच्छा नसताना लढावे लागणार आहे. त्यात त्यांचा विधानसभेचा मतदारसंघ त्यांना कायमचा दुरावणार आहे. शरद पवारांकडे जायला निघालेल्या महादेव जानकरांना देवेंद्रांनी दबाव टाकून शेवटच्या क्षणी आपल्याकडे वळवले खरे, पण त्यांची सोय कुठे लावायची हा प्रश्‍न सुटलेला नाही. बारामती आणि माढा या दोन्ही ठिकाणची उमेदवारी तर जवळपास जाहीर झाली आहे.

### मटक्याचे आकडे

आपण सत्तेसाठी काय वाटेल त्या चाली खेळू आणि सर्वांना इडीचा धाक दाखवून नियंत्रणात ठेवू असे भाजपच्या दिल्लीतल्या नेत्यांना वाटत होते. पण आता महायुतीतील भांडणे त्यांच्या आवाक्याच्या बाहेर गेली आहेत. युतीचे जागावाटप व उमेदवारांची आज घोषणा होणार अशा बातम्या गेले महिनाभर रोज छापून येत आहेत. यावरूनच आतमध्ये किती घमासान चालू असेल याचा अंदाज येतो. महायुतीकडे सत्ता आहे. तिच्या जोरावर ते अनेक गोष्टी रेटून नेतात. सर्व काही आलबेल असल्याचे भासवू शकतात. जानकर किंवा विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती यांच्यासारख्यांना भलभलती आश्‍वासने देऊ शकतात. पण स्थानिक पातळीवर सर्व कार्यकर्ते व नेते मॅनेज होऊ शकत नाही. शेवटी त्यांच्या प्रत्येकाच्या करियरचा प्रश्‍न असतो. नाशिकची जागा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. हेमंत गोडसे हे अनेक वर्षे खासदार आहेत. आता ते शिंदे गटात आहेत. त्यामुळे ती जागा शिवसेनेला मिळायला हवी. पण राष्ट्रवादी आणि भाजपलाही ती हवी आहे. अखेर गोडसे यांच्या कार्यकर्त्यांवर एकनाथ शिंदे यांच्यासमोर निदर्शने करण्याची पाळी आली. खुद्द ठाणे, कल्याण या जागांवर देखील भाजपने दावा सांगितला आहे. तिथे मुख्यमंत्र्यांच्या मुलाचीच कोंडी करण्यात आली आहे. भाजपचे नेते गेल्या वर्षी आपण ४५ जागा लढवू अशी स्वप्ने पाहत होते. आता ते जमिनीवर आले आहेत. आता त्यांना ३० किंवा ३२ जागा मिळतील असे दिसते. याबाबत गेल्या महिनाभरात मटक्याच्या आकड्यासारखे रोज नवे आकडे फुटत आहेत. मध्यंतरी अमित शाह महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. पण तेही मतभेद मिटवू शकले नाहीत. नंतर अजितदादा चर्चेसाठी दिल्लीला जायला देखील तयार नव्हते. शिंदेंचे प्रवक्तेही बोलेनासे झाले आहेत. याच दरम्यान आलेली सर्वेक्षणे युतीवाल्यांना त्यांची जागा दाखवून देणारी आहेत. त्यामुळे युतीच्या गोटात भीती आहे.

### जनतेत असंतोष

याचाच परिणाम म्हणजे ऐन वेळी राज ठाकरे यांना युतीत घेण्याचा खटाटोप. एकीकडे आमचे जागावाटप अंतिम झाले आहे असे सांगणारे युतीचे नेते आता राज यांना कोणत्या जागा देणार आहेत? मोदींचा करिश्मा महाराष्ट्र जिंकायला पुरेसा नाही याची पुन्हापुन्हा द्यावी लागत असलेली ही कबुली आहे. राज ठाकरे चार्टर्ड विमानाने दिल्लीत गेले. अमित शाह यांनी बोलावले म्हणून आपण आलो असे त्यांनी पत्रकारांना सांगितले. एरवी आपल्या शिवाजीपार्कच्या घरातून महाराष्ट्राचा कारभार हाकणारे आणि मनाचे राजे आहोत असे भासवणारे हे नेते दिल्लीश्‍वरांच्या आदेशासरशी धावत जातात हे लक्षात घेण्यासारखे आहे. अर्थात, ही भेट होऊन चार दिवस लोटले तरीही राज यांच्याबाबत फैसला झाला नव्हता. प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीत येण्यावरून बराच घोळ घातला गेला व तो अजूनही संपला आहे असे नव्हे. पण महायुतीमध्येही त्याहून अधिक गोंधळ चालू आहेत हे राज यांच्या उदाहरणावरून दिसते. माध्यमे आंबेडकर आणि महाविकास आघाडी यांना बदनाम करण्याची एकही संधी सोडत नाहीत. पण ती युती आणि राज यांच्या प्रेमात असल्याने त्यांच्यावर मात्र कधीही टीका होत नाही किंवा त्यांना वाईट प्रसिध्दी दिली जात नाही. आता प्रचाराला जसा वेग येईल तसतसे हे आपसातले मतभेद दडवले आणि दडपले जातील. मोदींच्या सभांना हे सगळे बाहेरून आलेले लोक हात जोडून एकत्र उभे राहतील. पण म्हणून त्यांच्या पक्षांमधील स्थानिक पातळीवरची भांडणे संपणारी नाहीत. याउलट महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये आपसात मतभेद आहेत हे जगजाहीर आहे. पण मोदींच्या हुकुमशाहीचा पराभव करण्यासाठी एक व्हायला हवे यावर त्यांचे एकमत आहे. निवडणूक रोखे, केजरीवाल अटक अशा प्रकरणांमुळे मोदींच्या भाजपचा काळा चेहरा सर्वांसमोर आलेला आहे. त्यामुळे जनतेतही प्रचंड असंतोष आहे. ही जनता नक्कीच महाविकास आघाडीच्या बाजूने उभी राहील व हा असंतोष मतपेटीतून व्यक्त करील.

---

विचार

# ‘इंडिया’ आघाडीला पुन्हा बळ

**भाजपने राहुल गांधी यांची संभावना कायम अपरिपक्व नेता अशी केली; परंतु ‘भारत जोडो यात्रे’पाठोपाठ ‘भारत जोडो न्याय यात्रा’ काढून देश समजून घेणाऱ्या राहुल गांधी यांचे मुंबईतील ताजे भाषण अनेकार्थांनी दखल घ्यायला लावणारे ठरले. राहुल यांची नंदुरबारपासून मुंबईपर्यंतची यात्रा महाविकास आणि इंडिया आघाडीला बळ देणारी तसेच लोकसभा निवडणुकीत भाजपची कोंडी करण्याकामी दिशा देणारी ठरली आहे.**



कथित ‘कमजोर’ राहुल गांधी यांना कायम ‘पप्पू’ असे संबोधणाऱ्या भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना सतत दखल का घ्यावी लागते, यातच त्यांचे वेगळेपण आहे. जंग जंग पछाडूनही अजून ‘ईडी’ला राहुल गांधी यांच्याविरोधात ठोस काही हाती लागलेले नाही. त्यांच्या मेहुण्याच्या चौकशीतून काहीच मिळाले नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला ३५ जागाही मिळणार नाही, असा आत्मविश्‍वास असेल, तर भाजपने खरे तर राहुल यांना अनुल्लेखाने मारायला हवे होते; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यापासून सर्वांना त्यांची दखल घेत रहावी लागते, यातच सारे आले. भाजपने राहुल यांचे मनोधैर्य कमी करण्यासाठी ते ज्या ज्या राज्यात गेले, त्या त्या राज्यातील मोठमोठ्या नेत्यांना ‘ईडी’, ‘सीबीआय’सारख्या यंत्रणांचा धाक दाखवून भाजपमध्ये नेले. महाराष्ट्रातही अशोक चव्हाण, मिलिंद देवरा, झिशान सिद्दीकी, पद्माकर वळवी अशा नेत्यांनी महायुतीत प्रवेश केला. त्याचा यत्किंचीतही परिणाम राहुल यांच्यावर झाला नाही. मुंबईच्या सभेत बोलताना जेलमध्ये जायची तयारी नसल्यानेच अशोक चव्हाण युतीकडे गेल्याचे राहुल यांनी यांचा नामोल्लेख टाळून सांगितले. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसनेच्या फुटीमागे गळा धरून नेत्यांना पक्षांतर करायला लावण्याचे राजकारण कारणीभूत असल्याचे राहुल यांनी ठासून सांगितले. अन्य कुणी त्यावर प्रतिक्रिया दिली नसली, तरी चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली; परंतु त्यात फार दम नाही. पक्षबदलू नेत्यांचा फार विचार करण्यापेक्षा ‘इंडिया’ आघाडीची नेमकी लढत पंतप्रधान नरेंद्र मोदी या व्यक्तीविरोधात नाही किंवा भाजप या एका पक्षाविरोधात आहे, हे त्यांनी सांगितले.

या पार्श्‍वभूमीवर संबंधित अदृश्य शक्तीशी लढताना काय आयुधे हाती घ्यावी लागतील, याचा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. त्याचबरोबर ही लढाई फारशी सोपी नाही, याची जाणीवही करून दिली. राहुल यांच्याकडे संभाषणचातुर्य नसेल, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारखे वक्तृत्व नसेल, प्रमोद महाजन यांच्यासारखा आक्रमकपणा नसेल; परंतु ते ज्या पद्धतीने सामान्यांमध्ये मिसळून सामान्यांचे प्रश्‍न मांडतात आणि निवडणूक मूलभूत प्रश्‍नांपासून भरकटणार नाही, याची दक्षता घेतात, हे इतरांनीही लक्षात घेण्यासारखे आहे. भारतीय जनता पक्ष निवडणूक भावनिक मुद्यावर नेण्याचा प्रयत्न करत आहे, हे वारंवार लक्षात आले

**राही भिडे**

आहे. आताही देशात मोठ्या शक्तीविरोधात लढण्याची भाषा राहुल यांनी केली असली, तरी मोदी यांनी देवी आणि नारीशक्तीशी लढाईचा मुद्दा मांडताना त्यांच्या भाषणाची मोडतोड केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

उत्कृष्ट नियोजन, शरद पवार आणि ठाकरे गटाचा सहभाग, महाविकास आघाडीतील काँग्रेस, माकप, वंचित आदी समविचारी संघटना यांच्या संयुक्त प्रयत्नाने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर वातावरणनिर्मिती करण्यात राहुल गांधी यांची ताजी सभा आणि एकूणच न्याय यात्रा यशस्वी ठरली. नंदुरबार जिल्ह्यातून पहिल्या डिजिटल आधार कार्डची नोंदणी झाल्याचा संदर्भ देणे असो वा आजारी असलेल्या रोहिदास पाटील यांची भेट घेऊन त्यांचा सोनिया गांधी यांच्याशी संवाद करून देणे असो; राहुल यांनी जुन्या आणि नव्या नेत्यांना कसे जपले पाहिजे, याचा वस्तुपाठ घालून दिला. केंद्र सरकार आणि भाजप शेतीप्रश्‍नांविषयी उदासीन राहिल्याचा आरोप विरोधक नेहमी करत असतात. कृषीविषयक तीन कायदे, दिल्लीच्या सीमेवर सुरू असलेले शेतकऱ्यांचे आंदोलन, नाशिक जिल्ह्यातील कांदा आणि द्राक्ष उत्पादकांची सुरू असलेली ससेहोलपट यामुळे शेतकऱ्यांच्या नाराजीला विरोधी पक्षांनी हवा देणे अपेक्षित होते. राहुल यांनी ‘भारत जोडो न्याय यात्रे’दरम्यान चांदवडच्या सभेत शेतीप्रश्‍नांविषयी घेतलेली थेट भूमिका शेतकऱ्यांना भावली. त्यांनी सुचवलेले पाच उपाय शेतकऱ्यांच्या दृष्टीने आशेचा किरण ठरू शकतात, अशी वातावरणनिर्मिती करण्यात त्यांना यश आले.

देशात पीकविम्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. हे पैसे कोणत्या कंपन्यांच्या घशात जातात आणि प्रतिकूल हवामानामुळे नुकसान होऊनही शेतकऱ्यांच्या वाट्याला मनस्ताप कसा येतो, हे राहुल यांनी ज्या पद्धतीने सांगितले, त्यावरून त्यांचा त्याबाबतचा बारकाईने केलेला अभ्यास जसा पुढे आला, तसेच या लूटमार करणाऱ्या कंपन्यांमध्ये एकही दलित, आदिवासी आणि ओबीसी नाही, यावर त्यांनी भर दिला. मोठ्या उद्योजकांना १६ लाख कोटी रुपयांची करमाफी दिली जाते आणि वारंवार मागणी करूनही शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जात नाही; त्यांच्या पिकांना भाव नाही, निर्यातबंदीमुळे घसरलेले कांद्याचे भाव आणि द्राक्षे मातीमोल भावाने विकण्याची आलेली वेळ याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. मोठ्या उद्योगपतींप्रमाणे शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार किमान आधारभूत किंमत देण्याची भूमिका, पीकविम्याची पुनर्रचना, कांद्यासह सर्वच शेतीमालाचे आयात-निर्यात धोरण शेतकरीस्नेही करणे, शेतकऱ्यांना जीएसटीतून मुक्त करणे, या त्यांनी केलेल्या घोषणा प्रभावी ठरल्या. त्यातून निर्माण झालेले पोषक वातावरण मतदानापर्यंत टिकवून ठेवण्यासाठी महाविकास आघाडीला प्रयत्न करावे लागणार आहेत.

मुंबईत ‘भारत जोडो न्याय यात्रे’च्या समारोपाच्या सभेला राहुल गांधी यांच्यावर टीका करणारे आता त्यांच्या मांडीला मांडी लावून बसल्याचे दिसले. काश्मीरपासून चेन्नईपर्यंतचे परस्परांचे विरोधकही या निमित्ताने एका व्यासपीठावर आले. भाजपचा पराभव करण्यासाठी का होईना, एकाच ध्येयाने ते राहुल यांचे नेतृत्व अप्रत्यक्ष मान्य करताना दिसले. न्याय संकल्प पदयात्रा आणि शिवाजी पार्क येथील ग्रँड इंडिया रॅलीमध्ये दोन डझनहून अधिक राजकीय पक्ष आणि गटांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुंबईत राहुल गांधी यांची स्तुती करणाऱ्या आणि त्यांना मनापासून पाठिंबा देणाऱ्या अनेक नेत्यांमध्ये महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, द्रमुक नेते एम. के. स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते चंपई सोरेन, ‘नॅशनल कॉन्फरन्स’चे अध्यक्ष डॉ. फारूक अब्दुल्ला, बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर, झारखंडच्या माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना, जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती, भाकपचे सरचिटणीस दीपांकर भट्टाचार्य, ‘आप’चे नेते सौरभ भारद्वाज यांचा समावेश होता. राहुल गांधी यांनी यात्रेत भारत समजून घेतला. त्यांचा हा प्रवास उद्ध्वस्त झालेला भारत पुनर्संचयित करण्याचा प्रवास आहे. त्यांनी द्वेषाचा तिरस्कार करून प्रेमाचे दुकान उघडले आहे.

‘भारत जोडो न्याय यात्रे’च्या समारोपाच्या वेळी राहुल गांधी यांनी दोन गोष्टी आवर्जून केल्या. त्यात बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भेट देऊन संविधान अर्पण पत्रिकेचे वाचन केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. शिवशक्ती-भीमशक्तीच्या ऐक्यावर त्यांचा कसा भर आहे, हे यातून दिसले. देशात जाणीवपूर्वक द्वेष पसरवला जात आहे. द्वेष पसरू देऊ नका, हा संदेश त्यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’तून पुढे आला. शिवाजी पार्क हे आतापर्यंत शिवसेनेचे सभा गाजवण्याचे मैदान होते. प्रथमच या मैदानावर राहुल यांची टोलेजंग सभा झाली. शक्तीप्रदर्शनात महाविकास आघाडी यशस्वी झाली.

फराहुल यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’ची समारोप रॅली ‘इंडिया’ आघाडीची ताकद दाखवणारी ठरली. मागे ज्या चीनच्या मुद्यावर भाजपने काँग्रेसची कोंडी करण्याचा प्रयत्न केला होता, त्याच मुद्द्यावर राहुल यांनी भाजपची कोंडी केली आहे. सध्या धारावीतील युवकांच्या रोजगारक्षमतेवर कसा परिणाम होतो, हे त्यांनी आकडेवारीनिशी सांगितले. राहुल यांनी केंद्रावर निशाणा साधला. चीनशी स्पर्धा करणारे लघुउद्योग उद्ध्वस्त केल्याचा आरोप त्यांनी केंद्र सरकारवर केला. जीएसटी आणि नोटाबंदीमुळे देशातील रोजगाराच्या संधी संपत असून सरकारला छोटे उद्योजक, व्यापाऱ्यांना कसे उद्ध्वस्त करायचे आहे, या सगळ्याच्या विरोधात कसे उभे राहिले पाहिजे, हे त्यांनी मांडले. राहुल यांनी तरुणांना आवाहन करत आमच्यावर जबाबदाऱ्या आहेत; पण देशातील तरुणांच्याही जबाबदाऱ्या आहेत, असे सांगितले. त्यांच्या या भाषणाचा आणि अकरा लोकसभा मतदारसंघातील यात्रेचा महाविकास आघाडी कसा फायदा उठवते ते पहावे लागेल.

---

आजकाल

# ‘वो बंद कराने आये थे तवायफों के कोठे’

देशातील पाहिजे ते पक्ष फोडले होते, पाहिजे ती चिन्हे काढून घेतली होती, भ्रष्टाचारी धुऊन घेतले होते, चारशे पारचा नारासुद्धा दिला होता . सगळं कसं छान चाललं होतं आणि अचानक कुणीतरी ‘चंद्रचूड’ नावाचे गृहस्थ मधेच आले अन् साराच घोळ झाला. सर्वोच्च न्यायालयात उद्योगपतींनी त्यांची नावे बाहेर पडू नयेत म्हणून वकिलांची फौज उभी केली होती. पण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी धारेवर धरले. स्टेट बँकेने दिलेल्या यादीत नावे होती, पण कोणी कोणाला किती दिले, याची माहिती मिळत नव्हती. उद्योगपतींना किंवा फेक कंपन्यांच्या नावे पैसे देणाऱ्यांना एवढी भीती कसली वाटली असावी? ‘न खाऊंगा, न खाने दूंगा’ला सर्वोच्च न्यायालयाने उघडं पाडलं, हे मान्य करावंच लागेल. कारण ‘धनुष्यबाण’ ओढून पाहिला, पण तो भलतीकडेच गेला. ‘घड्याळा’चे काटे उलटे फिरवले, पण तेही पुढे जाऊन चालेना. ‘पंजा’ची बोटे छाटायचा प्रयत्न केला, पण हाताची ताकद कमी होईना. ‘इंजिन’ सेल्फ स्टार्ट करून पाहिलं, तर ते दोन-तीन शहरांच्या वर पळेना. अशी कसलीच गॅरंटी देता येईना. ज्यांना पळवायचं होतं त्यांना पळवलं. आता कोणी पळवायचं राहिलंही नाही. तरीपण भाजपच्या गोटात घबराट का निर्माण होते, हेच कळत नाही. पश्‍चिम बंगाल, तामिळनाडू, केरळमध्ये कोणी ईडी, सीबीआयला घाबरून पळापळ केल्याचे दिसत नाही. तेथे आपल्याच पक्षाला सोडून कुणीही पळून गेलेले दिसत नाही. मग आपल्या महाराष्ट्राच्या रक्तातच ही लाचारी का? आज महाराष्ट्रात नारायण राणे, अशोक चव्हाण, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, राज ठाकरे यांच्यासह शिवसेना व राष्ट्रवादीचे प्रत्येकी ४० आमदार शरण गेले की लाचार झाले, हे जनताच ठरवेल. आता पुढचा एक महिना भाजपला काहीच करायचं नाही. ही सगळी फौज

**प्रा. जयंत महाजन**

एकट्या उद्धव ठाकरेंवर तुटून पडणार आहे. अर्वाच्च भाषेत त्यांना शिव्या देणार आहेत . अमित शहा, देवेंद्र फडणवीस मनातल्या मनात हसतील की, मराठी रक्त किती सोपे आहे विकत घेण्यास. भाजपचे राजकीय डावपेच सर्वत्र यशस्वी ठरत आहेत व त्यांच्या मनाप्रमाणे सर्व घडत आहे, हेदेखील विरोधी पक्षांनी मान्य करायला पाहिजे . भाजपची रणनीतीच तशी असते. पासवान यांचा पक्ष फुटला. भाजपने त्यांचा भाऊ पशुपती कुमार पारस ज्याच्याकडे अधिक खासदार होते, त्याला जवळ करत केंद्रात मंत्रिपद दिलं. लोकसभेची टर्म संपताच त्यांनी पुन्हा खासदारकीचे तिकीट मागितलं.



भाजपने नकार दिला. आज पशुपतींकडून मंत्रिपदही गेलं आणि ते ‘एनडीए’ तून बाहेर फेकले गेले. उद्या हेच शिंदे, अजितदादा आणि राज ठाकरेंबद्दल घडणार नाही, याची खात्री देता येईल का? जवळपास २५ वर्षे जुन्या शिवसेनेचे भाजपवाले झाले नाही ते काल-परवा जन्माला आलेल्या गटाचे काय होणार? भाजप हा अजगर आहे व त्याची भूक दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सांगितल्याप्रमाणे सगळे प्रादेशिक पक्ष संपणार, उरणार फक्त भाजप. हे सांगूनही राज, शिंदे, अजितदादा भाजपच्या दावणीला जात असतील तर त्यांना कोण अडवणार? मुळात भाजपने नैतिकता, विचार, विश्‍वास गमावला आहे. सत्तेची झापडं डोळ्यावर असल्याने त्यांना ते दिसणार नाही. मुळात पक्ष फोडणे, नेते फोडणे हे वरवरचं राजकारण आहे . त्यामागचं पूर्वनियोजनबद्ध धोरण हेच की, कट्टर भांडवलशाही राबवून उद्योगपतींचा नफा वाढवणे अन् या कट्टर रक्तपिपासू भांडवलशाहीसाठी भाजपचं कट्टर हिंदुत्व हा एक ‘परिस’ आहे. सरसंघचालक गोळवलकरांनी संघाला कुठल्याही भांडवलशाही उद्योगपतीपुढे झुकू दिले नव्हते. आताच्या संघात ती धमक नाही. आजचा भाजप भांडवलदारांच्या हातचं खेळणं बनलाय. यात संघ हतबल आहे असंच दिसतंय. आजचा मोदीप्रणीत भाजप अंबानी, अदानींचे बाहुले बनून देशावर हिंदुत्वाच्या नावाखाली भांडवलशाही लादतोय. विविध उद्योग, कंपन्या सरकारला देणग्या देऊन मिंधे करत आहेत . कंपन्या सांगतील तसे धोरण देशावर जबरीने लादले जात आहे.

हिंडेनबर्ग रिपोर्ट आला, अदानींच्या खात्यावर वीस हजार कोटी कुठून आले? हा प्रश्‍न राहुल गांधींनी विचारून देशाला जाणीव करून दिली की, देश कोणत्या खड्ड्यात जातोय. एकीकडे देशाला हिंदुत्वाच्या नावाखाली बेशुद्ध ठेवायचं, तर दुसरीकडे देशाची समृद्ध अशी तिजोरी फोडायची. इलेक्टोरल बॉण्ड तर भाजपचं थोबाड फोडणारं प्रकरण आहे. तरीही भाजपच्या प्रेमात आंधळ्या झालेल्या लोकांना उमजून येणार नाही. ज्यांच्यावर कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांनाच पक्षात का घेतलं जातं? हाच प्रश्‍न शहरातील शहाणी, ग्रामीण भागातील अडाणी जनता विचारतेय. याला समाधानकारक उत्तर पृथ्वीच्या अंतापर्यंत तरी सापडेल काय? भाजपसारखे सरकार असेल तरच आपली डाळ शिजेल, म्हणूनच कोणत्याही किमतीवर अदानी-अंबानी हे सरकार पडू देत नाहीत. सरकार मजबूत दाखविण्यासाठी भाजप नैतिकता धाब्यावर बसवत विरोधी पक्ष व नेते पक्षात घेऊन आपल्या विरोधातला आवाज दाबत आहे. साधारण २५ वर्षांपूर्वीच्या काळात राजकारण म्हणजे समाजकारण होते . आता राजकारण हा एक ‘गलिच्छ धंदा’ झालेला आहे, असे अनेक घडामोडींवरून सिद्ध होत गेले. पंडित जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर नाथ पै, मधु लिमये, मधु दंडवते, पीलू मोदी, सुषमा स्वराज, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारखे नेते पुन्हा होणार नाहीत . काँग्रेसच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा करून सत्तेत आलेल्या मोदींचा कारभार बघून ‘गालिब’ चा एक ‘शेर’ आठवला. ‘वो बंद कराने आये थे तवायफों के कोठे, मगर सिक्कों की खनक देखकर खुद ही मुजरा कर बैठे।’

---

मराठी साहित्यिक दिनविशेष

### सत्तावीस मार्च

**१९१३:-** लेखिका, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या ताराबाई रामचंद्र साठे यांचा जन्म. ह्यांनी ‘अपराजित रमा’ मधून पंडिता रमाबाई सरावती यांचे ‘चरित्र’,‘खादी’ हा खादीची उत्पत्ती व गांधीजींचे त्यावरील विचारफयावर बेतलेला ग्रंथ आणि ‘संसद’ हा संसदेची माहिती देणारा ग्रंथ. **१९२३:-** कवी, कथा-कादंबरी आणि नाटककार मंगेश भगवंत पदकी यांचा जन्म. ग्रामीण अर्थशास्त्र या विषयाचा दांडगा अभ्यास असणाऱ्या पदकींनी या विषयात संशोधन करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध खेडी निवडून त्यांच्या स्थितीचा अहवाल व निबंध लेखन केले. साहित्याचा श्रीगणेशा काव्यलेखनाने ‘यक्षगान’, ‘खारीची पिल्ले’, ‘विभूत’ हे कथासंग्रह. ‘काशभट’, ‘चक्कर’, ‘जिवलग मज कैचे’, ‘अण्णा आणि अंडी’ या कादंबऱ्या, ‘उध्दव व राव जगदेवराव’ ही रुपांतरीत नाटके अशी साहित्य संपदा. पदकी यांनी मोजकेच लेखन केले. कलात्मक संयम, सुक्ष्म विनोद आणि वास्तवता हे त्यांचे लेखनाचे वैशिष्ट्य. **१९३२:-** कवी, कथाकार पुरुषोत्तम गणपत वनमाळी यांचा जन्म. ‘किशोरकुंजातील पशुपक्ष्यांच्या गमतीजमती’, ‘शाळा सुटली पाटी फुटली’, ‘माकडांची आनंदशाळा’ हे कवितासंग्रह तर ‘आनंदी बाग’, ‘ठकास महाठक’, ‘शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ’, ‘मानवतेचा पुजारी’, ‘सुंठीवाचून खोकला गेला’ आणि इतर कथा हे कथासंग्रह प्रसिध्द. **१९३२:-** लोकविज्ञानाचे यशस्वी आणि आघाडीचे लेखन, प्रभावी वक्ते सुधाकर भालेराव यांचा जन्म. स्वत:च्या दुर्बिणीतून आकाश निरीक्षणाचे कार्यक्रम भालेरावांनी छोट्या दोस्तांसाठी ‘बालवाडी’, ‘किशोर’, ‘कुमार’, ‘आनंद’ यातून विपूल प्रमाणात लेखन केले. तसेच विविध वृत्तपत्रातून खगोल या विषयावर लेखन. त्यांची ‘आपली सूर्यमाला’, ‘कृत्रिम उपग्रह आणि अवकाश’, ‘ते प्रवासी दूरचे’, ‘किमयागार’, ‘चला प्रयोग करु या’, ‘माझा छंद आकाश निरीक्षण’ मिळून डझनभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९३३:-** कवी, कथा-कादंबरी आणि नाटककार मंगेश भगवंत पदकी यांचा जन्म. ग्रामीण अर्थशास्त्र या विषयाचा दांडगा अभ्यास असणाऱ्या पदकीनी या विषयात संशोधन करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध खेडी निवडून त्यांच्या स्थितीचा अहवाल व निबंध लेखन केले. साहित्याचा श्रीगणेशा काव्यलेखनाने, ‘यक्षगान’, ‘खारीची पिल्ले’, ‘विभूत’ हे कथासंग्रह, ‘काशभट’, ‘चक्कर’, ‘जिवलग मज कैचे’, ‘अण्णा आणि अंडी’ या कादंबऱ्या, ‘उध्दवराव व जगदेवराव’ ही रुपांतरीत नाटके. पदकी यांनी मोजकेच लेखन केले. कलात्मक संयम, सुक्ष्म विनोद आणि वास्तवता हे त्यांचे लेखनाचे वैशिष्ट्य. **१९४१:-** लेखक, कवी कल्याण रावजी इनामदार यांचा जन्म. ‘सदा गबाळे’ या लोकनाट्यासह ‘श्री स्वामी समर्थ’, ‘अष्टविनायक महिमा’, ‘श्री उद्यान गणेशगीता’, ‘देवी उपासना’, ‘ब्रम्ह चैतन्य गीता’, ‘सार्थ गीता’ इ. काव्य त्यांच्या नावावर आहेत. **१९४६:-** दैनिके, साप्ताहिकांतून विविध विषयांवर लेखन करणारे बाबासाहेब दत्तात्रय पाटील यांचा जन्म. ‘डॉ. बापूजी साळुंके-व्यक्ती, कार्य, आठवणी’ हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित. **१९४८:-** साहित्यिक विनया खडपेकर यांचा जन्म. ‘भिंती’ लघुकादंबरी, ‘स्त्री स्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातले परिवर्तन (सामाजिक इतिहास)’, ‘प्रतिसाद’ कथासंग्रह, ‘मातृसेवा संघ (संस्था परिचय)’, ‘सूत्रचालक (अनुवादीत कादंबरी, मूळ लेखक - मनोहर माळगावकर), ‘एक होती बाय (अनुवादित कादंबरी, मूळ लेखक - सुरेन आपटे)’, ‘ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर (चरित्र)’ इ. पुस्तके त्यांची प्रसिध्द झाली आहेत. **१९५१:-** कथा, कादंबरी, नाटककार भारत जगन्नाथ सासणे यांचा जन्म. ते दहावी असतानाच त्यांनी पहिली कथा प्रकाशित झाली. हंस, स्त्री, किर्लोस्कर आदी नियतकालिकांतून त्यांच्या कथा प्रकाशित झाल्या. ‘जॉन आणि अंजिरा पक्षी’ हा त्यांचा पहिला कथासंग्रह. यानंतर कॉप, ‘लाल फुलांचे झाड’, ‘चिरदाह’, ‘अस्वस्थ विस्तीर्ण रात्र’, ‘अनर्थ’, ‘क्षितिजा वरती रात्र’ असे अनेक कथासंग्रह त्यांचे प्रसिध्द झाले. त्यांच्या कथा दीर्घत्वाकडे झुकणारी असून जगावेगळे अनुभव विश्‍व कवेत घेणारी आहे. ग्रामीण परिसरातील माणसे, त्यांच्या श्रध्दा, दैवते, वेगवेगळे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ यांची सूक्ष्म वीण गुंफत सासणे ज्या कथा वाचकांपुढे ठेवतात. तसेच त्यांच्या कथा ग्रामीण, आदिवासी, नागर विश्‍वातली माणसे, त्या माणसांमधली नाती, त्यांचे आपसातले गुंतागुंतीचे काहीसे विचित्र व्यवहार आणि त्यांच्या क्रियाप्रतिक्रिया यांचा विलक्षण पीळ त्यांच्या कथेत असतो. सासणे यांचा ‘दूर तेथे दूर तेव्हा’ आणि ‘सर्प’ या दोन लघुकादंबऱ्यांचा संग्रह प्रकाशित झाला. ‘मरणरंग’, ‘आतंक’, ‘जैन दहति पावक’ ही नाटके, जंगलातील दूरचा प्रवास ही लहान मुलांसाठी कादंबरी आणि ‘चल रे भोपळ्या’ व ‘हंडाभर मोहरा’ ही बालनाटके ही लिहिली. अलीकडच्या काळातील एक गंभीर व दमदार लेखक म्हणून ते प्रसिध्द आहेत. **१९५४:-** लेखक दिलीप दिनकरराव जाधव यांचा जन्म. ‘होरपळ’ ही कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९९५:-** लेखक विठ्ठल नागेश हंडियेकर यांचे निधन. ह्यांनी ‘भंडारा जिल्ह्याचा इतिहास’ हे पुस्तक लिहिले आहे. **२०००:-** लेखक, पत्रकार आणि प्रकाशन बाळकृष्ण दत्तात्रेय सातोस्कर यांचे निधन. गोमांतक या वृत्तपत्राचे संपादन आणि संपादकाची धुरा त्यांनी सांभाळली. कथा, कादंबरी, ललित लेख, अनुवाद अशा साहित्याच्या विविध प्रकारातील पन्नासहून आधिक पुस्तके त्यांनी लिहिली.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ मार्च

१) श्री. दिलीप काशिनाथ जोशी
थळआगर, अलिबाग, २७-३-१९४७

२) श्री. रामचंद्र सीताराम कोळी
आक्षी, २७-३-१९५२

३) श्री. भरत नारायण नाईक
थळ, अलिबाग, २७-३-१९५४

# पांढऱ्या कांद्याच्या भावात घसरण

## अलिबागमधील कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**गुणधर्मयुक्त आणि चविष्ट असलेल्या अलिबागचा पांढरा कांदा ८० रुपयांपासून १०० रुपये माळ विकला जात आहे. कांद्याच्या भावात गेल्या अनेक दिवसांपासून भरमसाठ घसरण झाली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी व स्थानिक विक्रेते मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. जीआय मानांकन मिळूनही कांद्याला भाव नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.**



अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील कांद्याला रायगड जिल्ह्यासह राज्य, देश विदेशात प्रचंड मागणी आहे. जिल्ह्यात फिरण्यास येणारे पर्यटक अलिबागचा कांदा खरेदी करून नेत असतात. अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची लागवड नोव्हेंबरमध्ये करण्यात आली होती. जीआय मानांकन मिळाल्याने अलिबागच्या कांद्याला चांगला भाव मिळेल या आशेने कार्ले, खंडाळे परिसरातील असंख्य शेतकऱ्यांनी लागवड केली होती. दोन महिन्यात कांदा झाला. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात कांदा तयार होऊन बाजारातदेखील पाठविण्यास सुरूवात झाली. या कांद्याला रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांसह रत्नागिरी, नवी मुंबई, वाशी, मुंबई, पुणे येथून मागणी येऊ लागली. सुरुवातीला पांढरा कांद्यांच्या चार माळी मणानुसार ६०० ते सातशे रुपयांना विकण्यात आला. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून कांद्याच्या किंमतीत प्रचंड घसरून झाली आहे. कांद्याच्या चार माळी तीन ते साडेतीनशे रुपयांनी विकला जात आहे. त्यामुळे कांद्याची एक माळ ८० ते शंभर रुपयांना विकली जात असल्याचे कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. त्यामुळे यातून खर्चदेखील भागत नसल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे.

कांद्यांचे भाव वाढण्याची अपेक्षा होती. मात्र शेतकऱ्यांची घोर निराशा किंमतीच्या घसरणीने केली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी व स्थानिक विक्रेते मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

> पांढऱ्या कांद्याला जीआय मानांकन प्राप्त झाल्याने कांद्याची किंमत वाढण्याची शक्यता होती. परंतू घोर निराश झाली आहे. ८० ते १०० रुपयांनी माळ विकली जात आहे. खर्चही भरून निघत नाही. कांद्याला हमी भाव मिळावा ही मागणी वारंवार होत आहे. मात्र याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे. कांद्याला भाव नसल्याने आर्थिक समस्या निर्माण झाली आहे.
>
> – प्रभाकर नाईक
> कांदा उत्पादक शेतकरी



# उरणमध्ये संयुक्त बैठकीचे आयोजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात विविध जाती धर्माचे लोक आपले सण साजरे करत आहेत. हे संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांनी पाहिले आहे. त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून याहीवर्षी रमजान महिन्यात आलेला शिवजयंती उत्सव एकसंघ साजरा करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन वपोनि सतीश निकम यांनी उरण वासियांना केले आहे.

यावर्षी रमजान महिन्यात गुरुवारी (दि.२८) शिवजयंती उत्सव येत असल्याने दोन्ही समाजांच्या लोकांनी दोन्ही सण गुण्यागोविंदाने साजरे करण्यासाठी एकसंघ व्हावे यासाठी नवीमुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी मंगळवारी (दि.२६) त्यांच्या दालनात सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी, मुस्लिम बांधव यांच्यात संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी दोन्ही सणांचे महत्त्व पटवून देताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम हे बोलत होते.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**विहान पंकज म्हात्रे, वाढदिवस अलिबाग**



# महिलांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथे गुरुचैतन्य सेवाभावी संस्था आणि रणरागिणी महिला मंडळ यांच्या माध्यमातून महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रणरागिणी महिला मंडळाच्यावतीने राबविण्यात आलेल्या टेलरिंग आणि पार्लर कोर्सेस पूर्ण करणाऱ्या महिलांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमानंतर महिलांसाठी आधार कार्ड नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रणरागिणी महिला मंडळ यांच्या माध्यमातून आयोजित आधार कार्ड शिबिरात २०० जणांनी दुरुस्ती आणि नवीन नोंदणी केली. याप्रसंगी ज्योती देशमुख, मीना थोरवे, उषा पारधी, म्हात्रे, वर्षा बोराडे आदी प्रमुख उपस्थित होत्या.

## सुरेश जैन यांचे निधन

**म्हसळा :** तालुक्यातील प्रसिद्ध कापड व्यापारी, म्हसळा तालुका जैन समाज अध्यक्ष सुरेश भूरमल जैन यांचे शनिवारी (दि.२३)अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ६१ होते. त्यांच्या पश्चात पत्नी,



दोन मुली, मुलगा, भाऊ, चार भहिणी, जावई, सुन, नातवंड आणि आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने जैन आणि सामजिक मित्र परिवाराचे मोठे नुकसान होऊन कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली असल्याची मनोभावना समीर बनकर, सुरेश कुडेकर, संजय खांबेटे, अशोक काते, ओसवाल, जैन यांनी श्रद्धांजली वाहिली. सोमवारी (दि.२५) दुपारी दोन वाजता म्हसळा हिंदु स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विठ्ठल रखुमाई वर्धापन दिन



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रामचंद्र मणिराम सिंगासने श्रीगांव यांनी त्यांच्या आईवडिलांच्या स्मरणार्थ गतवर्षी श्री क्षेत्र रामेश्वर चौल येथे विठ्ठल रखुमाईच्या मुर्तीची प्राण प्रतिष्ठापणा केली. त्याचा वर्धापनदिन बुधवारी (दि.२०) विविध धार्मिक कार्यक्रमांत संपन्न झाला. याप्रसंगी काकड आरती, गणपतीपूजन, होमहवन, अभिषेक, प्रवचन, हरिपाठ, किर्तन इ. कार्यक्रमाची मांदियाळी होती.

यावेळी प्रफुल्ल पुनकर यांचे प्रववचन, विद्याधर निळकर व साथकरी मंडळ देहेन यांचे हरिपाठ, तसेच रमाकांत शास्त्री व पांडुरंग शितोळे यांची सुश्राव्य अशी किर्तने झाली. किर्तनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी चौल परिसरातील अनेक विठ्ठल भक्त व शिवभक्तांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामेश्वर भक्त मंडळ व विठ्ठल भक्तांचे विशेष सहकार्य लाभले.

# रिक्षा संघटनेच्यावतीने आर्थिक सहाय्य

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुका द्रोणागिरी माऊली रिक्षा चालक-मालक संघटनेच्यावतीने मृत्यू नंतर प्रत्येक रिक्षा चालकास आर्थिक सहाय्य दिले जाते. गेले २५ वर्षांपासून हा उपक्रम सुरु आहे. नुकतेच उरण शहरातील पालवी हॉस्पिटलजवळ असलेल्या रिक्षा चालक-मालक संघटनेच्यावतीने संघटनेचे सदस्य सुनील नामदेव पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या परिवारास (मृत्यू फंड) आर्थिक सहाय्य १० हजार रुपये देण्यात आले.



यावेळी किशोर पाटील, अजय धोत्रे, श्याम घरत, जयराज म्हात्रे, रमेश ठाकूर, दिपक म्हात्रे, महेंद्र घरत, के .के. म्हात्रे, गंगाधर पाटील, पांडुरंग भोईर, विलास म्हात्रे, कैलास म्हात्रे, मयूर ठाकूर, नरेंद्र म्हात्रे, भरत म्हात्रे, तुलसीदास पाटील आदि सदस्य होते.

# वणव्यामुळे वडाचे झाड कोसळले

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुरुडमधील दत्त मंदिर राजवाडा परिसरात डोंगरावर लागलेल्या वणव्याचा परिणाम नबाबाच्या राजवाड्यासमोर रस्त्याच्याकडेला असलेले शेकडो वर्षे जुने वडाच्या झाडाला आग लागून मंगळवारी (दि.२६) पहाटे पाच वाजताच्या सुमारास हे झाड रस्त्यावर कोसळले. सुदैवाने जिवित व वित्तहानी टळली असली तरी काहीकाळ वाहतूक पुर्णपणे ठप्प झाली होती. सकाळच्या वेळेत दूध वाहतूक, मुंबई-पुणे



प्रवास करणाऱ्यांना याचा त्रास सहन करावा लागला. यावेळी रस्त्यावर वडाचे झाड कोसळल्याचे वृत्त समजताच प्रादेशिक वनविभागाचे वन परिमंडळ अधिकारी विजय कोसबे, संदीप घरत, पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय राठोड, सहाय्यक फौजदार दिपक राऊळ, ठाणे अंमलदार गणेश डोंगरे, मकरंद पाटील, पो.काँ.धनंजय पाटील, नायब तहसीलदार संजय तवर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी तसेच स्थानिकांच्या मदतीने रस्त्यावर आडवे झालेले झाड हटविण्यात येऊन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## बालकांना खेळण्यासाठी प्रोत्साहित करा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

बाल विकास प्रकल्प रत्नागिरी सिंधुदुर्ग नागरी प्रकल्पातर्फे शुन्य ते तीन वयोगटातील मुलांसाठी व पालकांसाठी पालक मेळावा आयोजित करण्यात आला. बालकाचा सर्वांगीण विकास विशेषतः भावनिक विकास उत्तम रीतीने घडून येण्यासाठी पालकांनी घरी आणि अंगणवाडीमध्ये बालकांना खेळ खेळण्यास प्रोत्साहन द्यावे, असे प्रतिपादन साधना पागी यांनी केले.

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी बौद्धिक, भावनिक, शारीरिक विकासासाठी मेळाव्यामध्ये खेळ कृती प्रदर्शनी लावण्यात आले होते. बाल संगोपनाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी पालक मेळावा घेण्यात आला. गृहभेट व पालक सभेच्या माध्यमातून आपण थेट निगा राखणारी व्यक्ती पालक आणि कुटुंबातील इतर सदस्यांपर्यंत पोहोचू शकतो, तर पालक मेळाव्याद्वारे आपण समुदायातील प्रत्येक घटकापर्यंत बाल विकासाचे महत्त्व आणि संदेश पोहोचवू शकतो, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

# धनगर समाज आजही सुविधांपासून वंचित

**। रसायनी । वार्ताहर ।**

कोकण आणि रायगड जिल्ह्यातील धनगर समाजाच्या वाड्या-वस्त्या आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असून राज्यकर्त्यांनी फक्त समाजाचा मतदानापुरता वापर केला असून समाजाच्या विकासाकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप प्रवीण काकडे यांनी केला आहे. असे ते खालापूर (गोळेवाडी) येथील जनजागृती मेळाव्यात बोलत होते. धनागर समाजाच्या माध्यमातून युवकांना एकत्र करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संघटना अहोरात्र मेहनत घेत आहे. समाजातील मुले मुली शिकल्या तर समाजाची शैक्षणिक प्रगतीबरोबर आर्थिक प्रगती ही होईल.



कोकणासह रायगड जिल्ह्यातील खालापूर, कर्जत तालुक्यातील धनगर समाजाच्या वाड्या वस्त्यांवर आजही रस्ता, वीज आणि पाण्याची सोय नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून एकीकडे ७५ वर्ष पूर्ण झाल्याचे अमृत महोत्सव साजरा केला. परंतु, धनगर समाजाचा आजही विकास झाला नसून शिक्षणापासून वंचित आहे. धनगर आरक्षणाचा प्रश्न आजही तसाच असून राज्यकर्त्यांनी फक्त धनगर समाजाचा मतापुरता वापर केला आहे. लोकसभेची निवडणूक जाहीर झाली असल्याने समाजाने आतातरी शहाणे होऊन समाजाचा जो कोणी उमेदवार असेल त्याच्या पाठीमागे ठामपणे उभे राहून समाजाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा. जेणेकरून राजकीय पक्षाला आपल्या समाजाची ताकद कळून ते आपली दखल घेतील, असेही आवाहन प्रवीण काकडे यांनी केले आहे.

यावेळी संतोष घाटे, प्रकाश उघडे, सुनील कोकळे, डॉ.राजाराम हुलवान, मारुती गोरड, अनंता हिरवे, आनंदराव कचरे, रामचंद्र पुकळे, ओमकार कुचेकर, अरुणा दडस, किरण हिरवे, महादेव कारंडे, नथुराम ढेबे, बाळकृष्ण आखाडे, विठ्ठल जांगळे, नरेश आखाडे, गणेश बावदाने, मंगेश बावदाने, प्रकाश बुरगले, सतीश बंडगर, आशिष स्वामी, प्रफुल्ल जंगम, संजकुमार गोरड, सुरेश घाटे, महादेव घाटे आदी उपस्थित होते.

## हापूस आंब्याच्या नावाने फसवणूक

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आंब्याची आवक वाढली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आंबा बाजारात दाखल झाला असताना काही व्यापाऱ्यांकडून इतर जातीच्या आंब्यांची हापूसच्या नावाने विक्री केली जात आहे. त्यामुळे ग्राहकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी बाजार समितीने



अशा व्यापाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

चार डझनच्या आंब्याच्या पेटीमध्ये पहिल्या थरावर हापूस ठेवला जातो. त्यानंतर खालच्या थरांमध्ये इतर जातीचे तसेच अपरिपक्व असलेले आंबे भरले जातात. एकदा का पेटी घरी गेली की सहसा कोणी आंबे परत घेण्यासाठी येत नाही. ग्राहकांच्या याच मानसिकतेचा फायदा घेत एपीएमसीतील काही व्यापाऱ्यांकडून ग्राहकांची फसवणूक होत आहे.

# शंकराचार्यांच्या विचारांवरएकदिवसीय चर्चासत्र

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचेपां.वा.काणेरत्नागिरीउपकेंद्र आणि गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाच्या सहयोगाने जगद्गुरू शंकराचार्य यांच्या विचारांवर आधारित एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र २९ मार्चला शहरातील कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्रात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. हे चर्चासत्र सर्वांसाठी निःशुल्क असून, केवळ नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

चर्चासत्राच्या दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्वांसाठी अल्पोपाहार, भोजन, चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय चर्चासत्रात सहभागी व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. जगद्गुरू श्री शंकराचार्य हे सनातन संस्कृती आणि संपूर्ण भारत वर्षासाठी पूज्यस्थानी आहेत. भारताची भौगोलिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील एकता आणि अखंडता कायमस्वरूपी दृढ करण्याकरिता जगद्गुरू श्री शंकराचार्यांनी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केलं. भारताच्या एकात्मतेसाठी जगद्गुरू श्री शंकराचार्य यांचे योगदान हे अमूल्य आहे. या सगळ्या गोष्टींवर या चर्चासत्राच्या माध्यमातून प्रकाश टाकला जाणार आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गाण तर्फे परहूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) विनिता विवेक देशपांडे, २) विदुला विवेक देशपांडे व ३) विवेक वसंत देशपांडेयांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| गाण तर्फे परहूर | ६/५/ब/५ | ०-४०-०० | ०.६९ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेचआमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २७/३/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


# चौलमधील ताडगोळ्यांना पर्यटकांची पसंती

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**चौलमधील 'ताडगोळे' पर्यटकांची खास पंसती असून ऐन उन्हाळ्यात मोठी मागणी असते. चौल परिसरात 'ताडगोळ्यांची असंख्य झाडे असून ताडगोळे विक्रीतून स्थानिक मोठे उत्पन्न साधतात.**



उन्हाळयाच्या दिवसांत अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरिरातील पाण्याचे प्रमाण टिकवून धरतात. अंगातील उष्णता कमी करणाऱ्या ताडगोळयांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. ताडगोळे हे फळ उन्हाळयात उपलब्ध असणारे फळ आहे. यांची चव काहीशी शाळयांतील मलई सारखी लागत असून चवीला हे फळ फारच मधूर असते. इंग्रजी भाषेत 'आईस ॲपल' म्हणून ओळखले जाणारे फळ आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. त्यामुळेच मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून तसेच परिसरातून आलेले पर्यटक, स्थानिकवर्ग ताडगोळे खरेदी करत असल्याचे चित्र रेवदंडा-चौल बाजारपेठेत दिसत आहे. उन्हाळयात येत असलेल्या ताडगोळयांना बाजारात चांगली मागणी असते.

या फळाच्या सेवनाने शरिराला आवश्यक असलेले क्षार व इतर पोषक तत्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. या फळामध्ये कर्करोग प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते. आरोग्यासाठी या फळाचे फायदे मिळविण्यासाठी उन्हाळयाच्या दिवसामध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे. ज्यांना लिव्हरच्या संबधीत काही विकार असतील त्याचेसाठी ताडगोळयांचे सेवन उपयुक्त आहे. तसेच, या फळाच्या सेवनाने शरिराला श्रम करण्याची आवश्यक ताकद व उर्जा मिळते. या फळाच्या सेवनाने शरिरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनातून मिळत असते.

अश्या या गुणकारी ताडगोळे फळांची फार मोठी मागणी उन्हाळयात पर्यटक व स्थानिक वर्ग करत असतो. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष असंख्य संख्येने असून या ताडाच्या वृक्षाच्या लागवड करणे दिवसेंदिवस गरजेचे आहे.

निवडक

## विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट

**पेण :** महात्मा गांधी ग्रंथालय व वाचनालयात पेण नगरपालिका शाळा क्रमांक तीनमधील विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी ग्रंथालयाचे अध्यक्ष अरविंद वनगे यांनी मुलांसोबत बालगीते व प्रबोधन गीते गायली. दीपिका कदम व नम्रता पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचनालयात पुस्तके कशी मांडली जातात, त्याला नंबर कसे दिले जातात, आपल्याला पाहिजे ते पुस्तक कसे निवडायचे याची माहिती दिली. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना उपयुक्त अशा ५० पुस्तकांचे संच भेट म्हणून दिले.

## सुट्ट्यांमुळे वाहतूक कोंडी

**पनवेल :** सलग सुट्ट्या आल्याने नवी मुंबईत असणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात मोठ्या प्रमाणात मालाची आवक झाली होती. त्यात मंगळवारी (दि.२६) माथाडी कामगारांचे आराध्य दैवत स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मेळावा असे दोन्ही एकत्र आल्याने काही काळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. मात्र जागोजागी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आल्याने वाहतूक हलती झाली होती.

## महामार्गावर गुटखा जप्त

**पनवेल :** पनवेल-सायन महामार्गावर मुंबईकडे गुटखा घेऊन जाणारा टेम्पो पकडला असून यात तब्बल नऊ लाखांचा गुटखा आढळून आला आहे. या प्रकरणी गुटखा जप्त केला असून दोन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. मंगळवारी पहाटे शीव-पनवेल मार्गावरून एक टेम्पो मुंबईच्या दिशेने जात होता. सदर टेम्पो नियमित तपासणीसाठी अडवला. त्यावेळी चालक आणि शेजारी बसलेल्या आरोपींना व्यवस्थित उत्तरे देता न आल्याने पोलिसांनी टेम्पोची तपासणी केली असता त्यात गुटखा आढळून आला.

## अवैध फलकबाजीवर कारवाई

**पनवेल :** पनवेल महापालिका आयुक्तांनी आदर्श आचारसंहितेचा भंग करु नका असे आवाहन नागरिकांसह राजकीय पक्षांना केले होते. मात्र, तरीही आचारसंहितेचा भंग करून पनवेल महापालिकेची परवानगी न घेता थेट फलकबाजी केल्यामुळे पालिकेने संबंधित शुभेच्छुक संदेश देणाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. पालिकेच्या या धडक कारवाईमुळे पालिका प्रशासनाकडून फलकासाठी परवानगी न घेता थेट फलक लावणाऱ्यांना हा पालिकेचा इशारा आहे. असे सांगण्यात आले आहे.

## रसायनित नागरिकांची गैरसोय

**रसायनी :** वासांबे मोहोपाडा आणि चांभार्लीत वीजपुरवठा सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास बंद झाला होता. त्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. असह्य उकाड्यामुळे नागरिकांची झोपमोड झाली. दरम्यान काही तासांमध्ये तांत्रिक बिघाड दूर करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. वासांबे मोहोपाडा, चांभार्ली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वासांबे मोहोपाडा, खाने आंबिवली, आळी आंबिवली, नवीन पोसरी, शिवनगर, रीस, नवीन रीस, चांभार्ली, कांबेत दोन तास वीजपुरवठा तांत्रिक बिघाडामुळे खंडित झाला होता.

# एकात्मिक बालविकासाचा भार प्रभारींवर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जतमध्ये आदिवासी आणि दुर्गम भागाच्या तालुक्यात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पोषण आहार देण्यासाठी अंगणवाडी केंद्र चालविले जातात. या सर्व केंद्रांचे नियोजन करण्यासाठी एकात्मिक बालविकास विभाग काम करीत आहे. तालुक्यात ३३० अंगणवाडी केंद्र असून त्या केंद्रांचे संचलन करण्यासाठी कर्जत एक आणि कर्जत विभाग रायगड जिल्हा परिषदेने बनविले आहेत. मात्र, त्या दोन्ही प्रकल्पमध्ये प्रकल्प अधिकारी यांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, तर प्राथमिक आरोग्य केंद्र हद्दीतील अंगणवाडी यांच्या नियोजनाची जबाबदारी असलेली पर्यवेक्षकांची ११ पैकी सहा पदे रिक्त असून सर्व ठिकाणी कारभार हा प्रभारींवर सुरु आहे.**

कर्जत तालुका कुपोषित बालके असलेला तालुका म्हणून चर्चेत राहिला आहे. या तालुक्याची भौगोलिक रचना पाहता तालुक्याचा पसारा मोठा आहे. त्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात या ठिकाणी वस्ती करून राहत असल्याने या भागातील लोकांचे कामासाठी होणारे स्थलांतर लक्षात घेता कुपोषण समस्या चिंतेची बाब ठरली आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडी केंद्र असून त्या गावे आणि आदिवासी पाडे यांच्या ठिकाणी असणारी अंगणवाडी केंद्रामधून बालकांना पोषण आहार दिला जातो. त्याचवेळी गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना देखील पोषण आहार दिला जातो. मात्र, सर्व यंत्रणेवर तालुका स्तरावरून लक्ष देण्यासाठी असलेले प्रकल्प अधिकारी यांची पदे रिक्त आहेत.

### ■ पर्यवेक्षिकांची अनेक पदे रिक्त



तालुक्यात कर्जत एक आणि कर्जत दोन अशी एकात्मिक बालविकास विभागाची प्रकल्प असून त्यातील प्रकल्प एकमध्ये १६० अंगणवाड्या केंद्रांचा समावेश आहे. त्यांच्या प्रकल्पामध्ये सहा पर्यवेक्षिकांची मंजूर पदे असून, सध्या चार पर्यवेक्षिका या कार्यरत आहेत. प्रकल्प दोनमध्ये १७० अंगणवाडी केंद्र असून, त्या अंगणवाडी केंद्रांसाठी पाच पर्यवेक्षिकांची पदे मंजूर असून त्यात केवळ एकमेव पर्यवेक्षिका कार्यरत आहे. चार पदे रिक्त आहेत. तालुक्यात दोन प्रकल्प असून त्या दोन्ही प्रकल्पात समन्वयाची भूमिका बजावणारे विस्तार अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. मात्र, तालुक्यातील दोन विस्तार अधिकाऱ्यांच्या पैकी एका विस्तार अधिकाऱ्यांची बदली झाली असून एका विस्तार अधिकारी यांचे पद देखील रिक्त आहे.

तालुक्यात ३३० अंगणवाडी केंद्रांमध्ये १७००० बालके येत असतात आणि त्यांना पोषण आहार दिला जातो. त्या बालकांना कुपोषणाच्या समस्येतून बाहेर काढण्यासाठी ई-एकात्मिक बालविकास प्रकल्पांची महत्वाची भूमिका असते. मात्र, तालुक्यात एकात्मिक बालविकास प्रकल्पामध्ये असलेले दोन्ही प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून तालुक्यात अंगणवाडी केंद्रावर जाऊन तेथील आढावा घेणाऱ्या पर्यवेक्षिकांची मंजूर ११ पदे असताना त्यातील सहा पर्यवेक्षिकांची पदे रिक्त असल्याने एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाचा कारभार रामभरोसे सुरु असल्याचे स्पष्ट होत आहे.

# बैलगाडा शर्यतीच्या बैलाचा वाढदिवस

### अंत्राट गावात काढली मिरवणूक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

बैलगाडा शर्यतीचा नाद वेगळाच असतो, गेली दोन वर्षे कर्जत बैलगाडा शर्यतीचे महत्वाचे ठिकाण बनले आहे. तालुक्यात चक्क बैलगाडा शर्यतीच्या बैलाचा वाढदिवस समस्त गावकऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. 'दि बुलेट रॉयल किंग ग्रुप' अंत्राटमधील 'डीजे' या बैलाचा वाढदिवस मालकाने गावात मिरवणूक काढून साजरा केला.

अंत्राटतर्फे वरेडी हे गाव असून या गावातील 'डीजे' बैल लोकप्रिय बनला आहे. मात्र, त्यात अंत्राट गावातील 'दि बुलेट रॉयल किंग ग्रुप' 'डीजे' बैल चर्चेचा विषय ठरला आहे. बैलगाडा शर्यतीची अनेक मैदाने मारणाऱ्या 'डीजे' या बैलाने मारल्याने या बैलाविषयी उत्सूकता निर्माण झाली आहे. आठ वर्षे वयाचा हा 'डीजे' बैल आणि त्याचा ग्रुप यांनी आपल्या डीजेच्या चाहत्यांना खास भेट देतांना चक्क आपल्या लाडक्या डीजेचा वाढदिवस साजरा केला.



अंत्राट गावात मिरवणूक काढण्यात आली. त्यात ग्रामस्थ सहभागी झाले होते. फटाक्यांची आतषबाजी आणि जोडीला डीजेची धूम यासह डीजे बैलाची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीनंतर केक कापून साजरा करण्यात आला. जमलेल्या पाहुण्यासाठी जेवणावळी देण्यात आली.




● दहावीचा शेवटचा पेपर देऊन बाहेर पडलेले विद्यार्थी. (छायाचित्र: राजेश डांगळे)

# चारचाकी गाडीला आग

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका चारचाकी गाडीला पनवेल तालुक्यातील नांदगाव जवळ आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. रमेश गामी (४२, रा.ठाणे) हे परिवारासह निसान तेरेना गाडी क्रमांक एमएच ४६ एएल ७२२० ही गाडी जेएनपीटी बाजूकडून पळस्पे बाजूकडे जात असताना पनवेल तालुक्यातील नांदगाव जवळ त्यांच्या गाडीने अचानक पेट घेतला. सदर गाडीला आग लागल्याची माहिती समजताच वाहतूक शाखेचे योगेश भोईर, प्रशांत भोईर, संदीप पाटील, भुंडेरे, ढेंबरे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पनवेल महापालिका अग्निशमन दल आणि नवीन पनवेल अग्निशमन दलाला पाचारण करून सदरची आग आटोक्यात आणली. यात कारचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



# नांदगाव विद्यालयात वाचन मेळावा



**। पाली/गोमाशी । वार्ताहर।**

आनंदी वाचन संस्था पुणे व बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या संयुक्त विद्यमाने संत नामदेव माध्यमिक विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे नुकताच वाचन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

वृषाली जोगळेकर आणि कमांडर तुळपुळे यांनी कौशल्याच्या आधारे हसत खेळत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. पासवर्ड वाचन अभियानाच्या माध्यमातून धोकेबाज मुलांसाठी भन्नाट खुराकांचा समावेश या पुस्तकात करण्यात आला आहे. या पुस्तकात भन्नाट कथा, भारी अनुभव, थोडी माहिती थोड्या गमती, हे नक्की वाचा, फोटोमधून वाचू शिकू यांचा समावेश करण्यात आला. आनंदी वाचन संस्थेच्या वतीने शाळेस सहा हजारची पुस्तके भेट देण्यात आली. पासवर्ड हे पुस्तक सर्व विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले त्या पुस्तकावर आधारित स्पर्धा घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी वृषाली जोगळेकर, आनंद अवधानी, तुळपुळे, प्राचार्य संभाजी ढोपे, जितेंद्र गद्रे, वैभव आपटे, प्रमोद पावगी, विश्वास गद्रे, माधव वैशंपायन, विद्यालयातील शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते.

## मोटारसायकल स्वारांकडून दंड वसूल

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा व सणासुदीच्या निमित्ताने पनवेल शहर पोलिसांनी केलेल्या नाकाबंदी स्पेशल कारवाईत मोटारसायकल स्वारांकडून एकूण २१,९०० रुपये दंड वसूल करण्यात आला. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्यासह पोलिसांची पथके व वाहतूक शाखेचे पथक आदींची वडाळे तलाव या ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती.

नाकाबंदी दरम्यान, पोलीस संतोष कोळंबेकरांनी वडाळे तलाव परिसरातील नंबर प्लेट नसलेले, मुळ सायलेन्सरमध्ये बदल केलेले, वाहन चालवण्याचा परवाना नसलेल्या दुचाकी वाहनांना पोलीस ठाणे येथे आणून कारवाई करून त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात आला आहे. सदर कारवाई अंबादास कांबळे, संजय धारेराव, दत्तात्रय शिंदे, किरण सोनवणे आदी उपस्थित होते.



# वाहनचालकांची गैरसोय

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी परिसराचा केंद्रबिंदू व मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या मोहोपाडा शहरात वाढत असलेली वसाहत, नवीन झालेले कॉलेजेस, कार्यालये तसेच कारखानदारी व त्यांच्या वसाहती यामुळे मोहोपाडा शहराची लोकसंख्या वाढत चालली असून परिसरात दुचाकी व चारचाकी वाहनांमध्ये वाढ झाली आहे.



बाजारपेठेचा केंद्रबिंदू असलेल्या मोहोपाडा शहरात सायंकाळी नेहमीच ट्रॅफिक जाम होते. आसपासच्या गावातील नागरिक बाजारहाट करण्यासाठी आले की, वाहन कोठे उभे करावे हा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी वाहनचालक मध्येच गाडी उभी करुन खरेदी अथवा इतर कामासाठी बाजारात जातात.

अशावेळी एखादे वाहन आले तर त्या थांबलेल्या वाहनामुळे ट्रॅफिक जाम होऊन नागरिक व प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो. वाहनतळ झाल्यास वाहनचालकांची गैरसोय टळेल तसेच वाहतूक कोंडीही होणार नाही. काहीवेळा तर दुकानासमोरही वाहने दुचाकीस्वार लावतात त्याला या दुचाकीस्वारांना पर्याय नसल्यामुळेच ही वाहने कोठेही लावली जातात. त्यामुळे दुकानात ग्राहकाला जाणेही कठीण होते. वाहनचालक, ग्राहक व नागरिकांना होणारा त्रास शासनाने दूर करण्याच्या दृष्टीने मोहोपाडा शहरात एखाद्या ठिकाणी वाहन पार्किंगस्थळ तयार करावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## काँक्रीटचा मिक्सर पडून एक ठार

**। महाड । वार्ताहर ।**

महाड तालुक्यातील गोंडाळे येथील वाडीवर बंधाऱ्याचे काम सुरू असताना काँक्रीटचा मिक्सर अंगावर पडून अपघात झाला. या अपघातामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला असून एक कामगार जखमी झाला आहे. तालुक्यातील बोंड आळी देऊळकोंड येथे जलसंधारण विभागाचे बंधाऱ्याचे काम सुरू असताना मंगळारी (दि.२६) काँक्रीट मिक्सर पलटून झालेल्या अपघातात एक कामगार जागीच ठार झाला. मैनूद्दिन अन्सारी वय १९ रा. मध्य प्रदेश, असे मयताचे नाव असून सुमित धाणे हा अपघातात जखमी झाला. अपघातानंतर तालुक्यात बांधकामांवरील तसेच खासगी बांधकामांवरील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# फ्लॅटला लागलेल्या आगीत मोठे नुकसान



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल जवळील नेरे येथील नीलकमल सोसायटीतील इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागली. यात घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महालक्ष्मीनगर नीलकमल सोसायटीच्या सेक्टर २, याठिकाणच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागल्याची घटना घडली. याबाबतची माहिती नवीन पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. अग्निशामक दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी फ्लॅटला लागलेली आग अवघ्या काही वेळात विझवली. आग लागल्यानंतर घरातील कुटुंबियांना ताबडतोब बाहेर काढण्यात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.

● फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)

● घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६
संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

● विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग
फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७

● चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६

● अलिबागमध्ये सलून कामासाठी अनुभवी मुलगा पाहिजे.
मो. ९९२१०७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानचा आल्हाददायक निसर्ग

**। माथेरान । वार्ताहर ।**

**होळीच्या विकेंडला माथेरान शहरात दाखल झालेल्या पर्यटकांना होळी आणि धुलिवंदनाच्या बरोबर येथील आल्हाददायक निसर्गरम्य वातावरणाचा पण मनसोक्त आनंद लुटता आला. माथेरानच्या गारेगार वातावरणात पर्यटकांनी भरपूर धमाल मस्ती केली.**

राज्यभरात सर्वत्र उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढत असला तरी महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले माथेरान पर्यटनस्थळी थंडावा कायम असून होळीच्या विकेंडला माथेरान शहरात दाखल झालेल्या पर्यटकांना येथील आल्हाददायक निसर्गाच्या सानिध्याबरोबरच गारेगार माथेरानचा देखील मनसोक्त आनंद मिळाला.





### ■ विकेंडला पर्यटकांनी लुटला मनसोक्त आनंद

मार्च महिन्याच्या सुरूवातीपासून इथले वातावरण गारेगार असून थंडावा कायम आहे. येथील पारा हा सोळा, अठरा ते वीस अंशावरच स्थिरावलेला आहे. त्यामुळे सकाळी आणि रात्रीच्या वेळेत तर येथे कमालीचा गारवा जाणवत आहे. तर मार्च महिन्याच्या चौथ्या विकेंडला होळी आणि धुलिवंदनाच्या सुट्ट्या आल्यामुळे पर्यटक मोठ्या संख्येने माथेरान शहरात दाखल झाले होते. होळी आणि धुलिवंदनाच्या दिवशी येथील बहुतांश हॉटेल व्यावसायिकांनी पर्यटकांसाठी मनोरंजनाबरोबरच डिजेचे आयोजन देखील केले होते. येथील निसर्गरम्य आल्हाददायक गारेगार थंड अश्या वातावरणात पर्यटकांनी मनसोक्त आनंद लुटला आणि त्यांनी खूप धमाल मस्ती केली असे सांगितले.

## विद्यार्थ्यांसाठी रसायनीत व्याख्यान

**रसायनी :** रसायनीतील वडगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वाशिवली येथील डॉ.पारनेरकर महाराज कनिष्ठ आणि महाविद्यालय येथे संवेदना डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या वतीने नुकतेच अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी किशोरावस्था आणि व्यसनाधीनता या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाला ६८ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. संवेदना डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना वयात येताना होणाऱ्या शारीरिक, मानसिक बदलांविषयी सोप्या भाषेत महत्त्वाची माहिती दिली. आजकाल तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या व्यसनांसंबंधित चर्चा केली. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ आपल्या आरोग्यासाठी किती घातक आहेत आणि ते आपल्या आरोग्यावर किती वाईट परिणाम करत असल्याची माहिती दिली. दरम्यान, आपण स्वतःला व्यसनांपासून कसे दूर ठेऊ शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्गाचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे उतेखोल, ता. माणगांव, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी मिळकतीच्या मूळ मालकांकडून कायम खुष खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीबाबत मिळकतीच्या मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत खाली सही करणार यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात, या मुदतीत हरकती न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून या मिळकतीबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. करिता जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे उतेखोल, ता. माणगांव, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे-

| भूमापन क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) | कब्जेदारांचे नाव |
|---|---|---|---|
| ७१/१२/अ/२ | २०.०० | २००.०० | श्री. अमितकुमार झवेरचंद शेठ |

दिनांक : २६/०३/२०२४

**ॲड. देवदत्त एम. ठाकुर,**
खरेदीदाराचे वकील
काळ प्रोजेक्ट कॉलनी जवळ,
मु. पो. ता. माणगांव, जि. रायगड.
मो.नं. ९१६८०७०२५२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बामणगांव, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीतील ०-३४-०० हे.आर. एवढे क्षेत्र विद्यमान मालक १. श्री. तुषार रघुनाथ कोलते व २. प्रथमेश चंद्रकांत थळे, दोघेही रा. माय शॉपच्या मागे, विद्यानगर, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड | १४२ | ०-५२-०० | १.१२ |

वर नमूद मिळकतींपैकी ०-३४-०० हे. आर.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.२७.०३.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मौजे-देहरंग, ता. पनवेल, जि.- रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क माझे अशिल श्री. अशोक शंकर अहिरे यांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालील प्रमाणे:-

**: मिळकतीचे वर्णन:**

**मौजे-देहरंग ता. पनवेल जि.- रायगड**

| भोगवटदाराचे नाव/हिस्सेदार | गट क्र. व उपविभाग | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्रफळ हे. आर. चौ.मीटर | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| अब्दुल रहीम इब्राहीम कच्छी | १/य प्लॉट नं ५/२ | सब प्लॉट नं ७ | भोगवटदार वर्ग-१ | ०-०५-० | ५०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, साठेकरार, विकसन करार,फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात माझे अशील खरेदीचा करार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची स्पष्ट नोंद घ्यावी .

ठिकाण - पनवेल
तारीख-२७/०३/२०२४

सही
**ॲडव्होकेट अपर्णा कुलकर्णी**
ऑफिस - शॉप नं-१ आगरी समाज बिल्डिंग लाईन आली
पनवेल ४१० २०६ फोन नंबर-९९२०२७१४६०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, :-

मौजे चेहेर, ता. मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार मोहन लक्ष्मण ठाकूर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| भूमापन क्र. | खाते नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | पिके | गांव |
|---|---|---|---|---|---|
| ३९/६/अ | २९१ | एकूण क्षेत्र ०-६३-३० पैकी मोहन लक्ष्मण ठाकूर यांचे मालकी हिश्श्याचे क्षेत्र ०-१८-३० हे. आर. पॉ. | ०-०९ | गवत, आंबा | चेहेर, ता.मुरूड |

सबब सदर वरील वर्णनाची संपूर्ण क्षेत्राच्या जमीन मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात, याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण :- मुरुड-जंजिरा.
दिनांक : २६/०३/२०२४

सही/-
**अन्वर ए. हुसेन**
ॲडव्होकेट
रा. एस.टी. डेपो जवळ, दत्तमंदिर रोड,
मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

Advt. No.- /20...... **Annexure- "B"**
Medical Faculty

# Dr. N .Y. Tasgaonkar Institute of Medical Science

Sau. Vandana Tasgaonkar Health Care Complex, Kalyan Karjat Road, Opp. Bhivpuri Road Railway Station, Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201,
Mail ID -dean.rhrc@tasgaonkartech.com Webside-www.nytims.in
Fax No. 02224318823 Ph-9529089935/ 8983621211
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

## WANTED

A) Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute

| Sr. No. | Subject | Professor | Reader | Lecturer | Tutor |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | SC-1 | OPEN-1 | OPEN-1 | |
| 2 | PHYSIOLOGY | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-2 | |
| 3 | BIO-CHEMISTRY | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-1 | |
| 4 | PHARMACOLOGY | | OPEN-1 | OBC-1, EWS-1 | |
| 5 | PATHOLOGY | VJ-1 | OPEN-1, OBC-1 | SC-1, ST-1, OBC-1 | |
| | BLOOD BANK | | | | |
| 6 | MICROBIOLOGY | NTC-1 | | SC-1 | |
| 7 | FORENSIC MEDICINE | | SC-1 | OBC-1 | |
| 8 | Community/ Medicine/ Preventive & Social Medicine | OPEN-1 | EWS-1, OPEN-1 | SC-1, ST-1 | |
| | Epidemiologist-Cum-Asst. Prof. | | | | |
| | Statistician –cum-Tutor | | | | OPEN-1 |
| | RHTC-MO cum Lecturer/ Asst. Prof. | | | | |
| | UHTC-MO cum Lecturer/ Asst. | | | | |
| 9 | GENERAL MEDICINE | SC-1 | SC-1, | SC-1, ST-1, OBC-1, EWS-1 | |
| 10 | PAEDIATRICS | OPEN-1 | OPEN-1 | EWS-1, OPEN-1 | |
| 11 | T.B. & RESPIRATORY DISEASES | | | OBC-1 | |
| 12 | V.D. & LEPROSY | | | VJ-1 | |
| 13 | PSYCHIATRY | | | OPEN-1 | |
| 14 | GENERAL SURGERY | | SC-1, ST-1 | NTB-1, OBC-1 EWS-1, OPEN-1 | |
| 15 | ORTHOPAEDICS | OPEN-1 | ST-1 | NTC-1 | |
| 16 | OPTHALMOLOGY | OBC-1 | OBC-1 | | |
| 17 | OTO-RHINO-LARYNGOLOGY (ENT) | NTB-1 | | | |
| 18 | OBSTETRICS & GYNAECOLOGY | EWS-1 | NTB-1 | NTD-1, OBC-1 | |
| | Antenatal Medical Officer cum Asst. Professor | | | | |
| | Maternity and Child Welfare Officer cum Asst. Professor | | | | |
| 19 | ANAESTHESIOLOGY | OBC-1 | SC-1 | SC-1, NTC-1, OPEN-1 | |
| 20 | RADIO-DIAGNOSIS | ST-1 | EWS-1 | OPEN-1 | |
| 21 | DENTISTRY | | | | |
| 22 | RADIOTHERAPY (Optional) | | | | |
| 23 | Emergency Medicine | | | | |
| | Differently abled persons | | | | |

B) **Qualification & Experience :**

| Post(s) | Qualification & Experience |
|---|---|
| Professor | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Associate Professor in the subject concerned for three years in recognized medical college. c) Four Research papers accepted/published in index/national journal as first/second author on cumulative basis. Out of these four research publications minimum two research publication must be published during the tenure of the Associate Professor. |
| Associate Professor/ Reader | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Assistant Professor in the subject concerned for four years in recognized medical college. c) Two Research papers accepted/published in index/national journal as first/second author during the tenure of Assistant Professor. |
| Assistant Professor/ Lecturer | a) Recognized Post graduate degree in the concerned subject. b) Three years teaching experience in the subject in a recognized Medical College as Resident / Registrar / Demonstrator / Tutor |
| Tutor / Demonst. | a) M.B.B.S. qualification or M. Sc. (Medical Anatomy) in particular subject as specified by M.C.I. candidate possessing post graduate qualification in subject will be preferred. |

**C) General Notes:-**

1) Horizontal Reservation for Ladies / Sports etc. as per the state government circular / regulations and the differently abled persons reservation as per the government regulations / circular issued from time to time (Ref: Government letter GAD/1118/CR417/16 dated 28/12/2018, for differently abled persons GR dated 27/04/2011, 04/08/2011, 28/07/2014, 29/05/2019 and MEDD letter dated 30/06/2015)(if applicable).

The vertical reservation allotments vide Government Resolution and circular dated 29/05/2017, 25/07/2018, 05/12/2018, 19/12/2018, 07/01/2019, 12/02/2019, 16/02/2019, 18/02/2019, 04/07/2019, 05/03/2020, 11/03/2020 etc. (if applicable).

2) Candidates applying for reserve category post(s) should submit caste certificate & caste validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable.
3) The benefits of reservation shall be admissible to the backward class / category candidates who are domiciled in the state of Maharashtra only (if applicable).
4) Age Limit & Educational Qualifications shall be considered up to last date of the application & experience shall be considered up to earlier day of the interview.
5) The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time.
6) Qualified teachers above the age of 64 years will be considered for appointment of one – one year, as per respective Council's norms.
7) Pay Scale is as per rules.
8) Application along with attested copies of all relevant certificates must reach to the College on or before: 10/04/2024

**D) Other Notes : (College Level)**
Apply to the **Dean,** at **Dr. NY Tasgaonkar Institute of Medical Science At Diksal, Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad 410 201** on plain paper / prescribed format along with attested copies of certificates and experience certificates.

**Sd/-**
**Dean**
**(Signature & College Seal)**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील खालील वर्णन केलेल्या मिळकती विदयमान मालक अब्दुलगनी अब्दुलहमीद लोगडे यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विदयमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील मालमत्ता क्रमांक ७५५/१ क्षेत्र १९५ चौ. फुट मालमत्ता क्र. ७५५/२ क्षेत्र २५३ चौ. फुट, हे व्यापारी गाळ व मालमत्ता क्र. ७५५/१ क्षेत्र ३२७ चौ. फुट, मालमत्ता क्र. ७५५/२ क्षेत्र ४३० चौ. फुट, मालमत्ता क्र. ७५५/३ क्षेत्र ४३० चौ.फुट, या निवासी सदनिका.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.२७.०३.२०२४

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलकडे, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक १. स्वाती राजेश संघवी व २. चिंतन चंपकलाल संघवी, यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड | ३७/१ | ०-१३-९० ०-०२-१०पो.ख. ०-१६-००एकूण | ३.३७ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.२७.०३.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील वाणिज्य गाळे विदयमान मालक निलोफर कासम हाफीज यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विदयमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड | ४/४/१/२ | २-५०-०० | २५.०० |

ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील मालमत्ता क्रमांक ७५५/३ क्षेत्र १९५ चौ.फुट मालमत्ता क्र. ७५५/४ क्षेत्र २५३ चौ.फुट, मालमत्ता क्र. ७५५/५ क्षेत्र ३२७ चौ.फुट, मालमत्ता क्र. ७५५/६ क्षेत्र ४३० चौ.फुट हे वाणिज्य गाळे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २७.०३.२०२४ **ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयाजवळ
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक यांच्या मालकीची मिळकती त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची विद्यमान मालकांसोबत बोलणी झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| हाशिवरे ता. अलिबाग | २४२/१ | ०-६५-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-६८-०० | ८.३१ |

सदर मिळकत जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/३/२०२४

सही/-
**ॲड. समीर य. म्हात्रे,**
मु. शिरवली, पो. हाशिवरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९५४५७६४८७८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली सदनिका तिचे मालक व्यंकटेश शंकरराव जाधव यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

'सि.स.नं. ४४५८ ते ४४६० या जमिन मिळकतीवर उभारण्यात आलेली 'अवधुत सह. गृहनिर्माण संस्था मर्या. गगनगिरीनगर', या इमारतीमधील विंग 'डी-२', पहिलामजला, सदनिका क्र. १० क्षेत्रफळ ६६०.०० चौ. फुट बिल्टप. खोपोली नगर परिषद मालमत्ता क्र. KHP000093365'.

तरी सदर सदनिकेवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, बक्षीस, वहिवाट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. २७/०३/२०२४
मो.९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन.**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे (बु.)
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या शेतजमीन मिळकती हया खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीनी मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : वाली, ता. रोहा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| हरिश्चंद्र दत्ताराम कासकर | ९२ | वरकस १-९३-०० पो.ख. ०-६४-०० २-५७-०० | १=०६ | १ |
| आमदी अब्दुरब मुल्ला | ९३ | वरकस १-०८-०० पो.ख. ०-३५-०० १-४३-०० | ०=६६ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा वहिवाट वचनचिट्टी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. २५/०३/२०२४

सही/-
**ॲड. श्री.पी.जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला. साई नगरी सोसायटी,
छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९, मोबा. क्र. ९२७२७१३९५६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे..

मिळकतीचे वर्णन : मौजे माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २/१/अ | ०.०४.०० पो.ख. ०.००.५० | ०.०५ | मनुबाई पुंडलिक खुटारकर |
| २/१/क | ०.०७.९० पो. ख. ०.००.२० | ०.३४ | मनुबाई पुंडलिक खुटारकर |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २७/०३/२०२४.

सही /-
**ॲड. प्रणित शिवराम भिंगारदिवे**
कर्जत, शॉप नं. ५, नेमिनाथ
शॉपिंग सेंटर, मुद्रे (बु.),
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो. नं. ९५९४९३०८८९.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रमोद हसुराम तांडेल, रा. घर नं. ९७०, खारघर गाव, ग्रीन फिंगर ग्लोबल शाळे समोर, सेक्टर १३, खारघर, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४६/५/ब | ०.१५.३० पो.ख. ०.००.८० | २.४६ | श्री. अशोक रामा जोगळे |
| | एकुण ०.१६.१० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा ) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २७/०३/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे. मो. नं. ७३८५००४८०६.

## निवडक

### मैदानात घुसला चाहता

**चेन्नई :** आयपीएलच्या सहाव्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जचा पराभव केला. एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर हा सामना खेळला गेला. या सामन्यादरम्यान, एका तरुण चाहत्याने सुरक्षेला चकवा देत विराट कोहलीला भेटण्यासाठी खेळपट्टीवर आला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दुसऱ्या डावात धावांचा पाठलाग सुरू केला. यावेळी एक चाहता खेळपट्टीवर कोहलीच्या जवळ आला आणि त्याच्या पायाला स्पर्श करून त्याला मिठी मारली.

### सूर्याच्या खेळण्यावर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा स्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवला एनसीएनं दुसऱ्या शारीरिक चाचणीनंतरही क्लीन चिट दिलेली नाही. त्यामुळे आता गुजरात टायटन्सविरुद्धचा सामना मिस झाल्यानंतर सूर्यकुमार यादव हैदराबादविरुद्धच्या सामन्यातही खेळू शकणार नाही. दुसऱ्या फिटनेस चाचणीनंतरही सूर्यकुमारला खेळण्यासाठी क्लीन चिट मिळालेली नाही. या अहवालात सूर्यकुमारची दुसरी फिटनेस चाचणी २१ मार्च रोजी घेण्यात आली होती.

### डुप्लिकेट धवनने वेधले लक्ष

**चेन्नई :** रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर विरुद्ध पंजाब किंग्स संघात सामना पार पडला. पंजाबकडून कर्णधार शिखर धवन सलामीला फलंदाजीला उतरला होता. धवनने दुसऱ्या गड्यासाठी प्रभसिमरन सिंगबरोबर अर्धशतकी भागीदारीही केली. धवन पंजाबच्या डगआऊटमध्ये बसलेला असतानाअचानक स्क्रिनवर धवनसारखाच हुबेहुब दिसणाऱ्या व्यक्तीला दाखवण्यात आले. प्रेक्षकांमध्ये पंजाब किंग्सची जर्सी घातलेला एक व्यक्ती धवनसारखाच लूक करून सामना पाहायला आला होता.

### पोलार्डने केली पाठराखण

**अहमदाबाद :** आयपीएलच्या सलामीच्या लढतीत पराभूत होण्याची मुंबई इंडियन्सची मालिका सलग १२व्या वर्षी कायम राहिली. रविवारी झालेल्या या सामन्यात मुंबईला आपला नवा कर्णधार हार्दिक पंड्याचा माजी संघ गुजरात टायटन्सकडून पराभव पत्करावा लागला.हार्दिकने सातव्या क्रमांकावर फलंदाजी केली आणि त्याच्या या निर्णयाचे अनेकांना आश्चर्य वाटले. हा निर्णय केवळ हार्दिकने नाही, तर पूर्ण संघ व्यवस्थापनाने मिळून घेतला होता, असे फलंदाजी प्रशिक्षक किरॉन पोलार्डने स्पष्ट केले.

### विराटच्या कॉलची चर्चा

**मुंबई :** आयपीएलमधील पंजाब किंग्सविरूध्दच्या सामन्यात सामनावीराचा पुरस्कार मिळालेल्या विराटने मैदानातून व्हीडिओ कॉलवर बोलताना दिसला. हा व्हीडिओ कॉल खास होता. कारण तो फक्त व्हीडिओ कॉलवर अनुष्काशीच बोलत नव्हता तर त्याचा लेक अकाय याच्याशीसुध्दा हावभाव करत गप्पा मारताना दिसला. व्हीडिओ कॉलवर कोहलीने चेहरा असलेली स्क्रिन मोठी ठेवली होती. त्यामुळे अनुष्का किंवा इतर कोणीही दिसू शकले नाहीत. पण व्हीडिओ कॉलवर बोलताना विराट स्वत:मध्येच मग्न झाला होता.

# कसोटी क्रिकेटचा थरार २२ नोव्हेंबरपासून

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेबाबत क्रिकेट ऑस्ट्रेलियानं मोठी घोषणा केली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये आता चारऐवजी पाच कसोटी सामने खेळले जाणार आहेत.कसोटी क्रिकेटमध्ये ३२ वर्षांनंतर या दोन देशांदरम्यान पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. यापूर्वी १९९१-९२ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली गेली होती. गेल्या दोन हंगामांपासून सातत्यानं कसोटी चॅम्पियनशिपचा अंतिम सामना खेळणाऱ्या भारताच्या सर्वाधिक लोकप्रिय कसोटी मालिकेचं वेळापत्रक जाहीर झालं आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आगामी वर्षासाठी त्यांच्या महिला आणि पुरुष क्रिकेट संघाचं वेळापत्रक जाहीर केलं. यामध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या बॉर्डर गावस्कर चषकाचीही घोषणा केली.**



१९९१-९२ नंतर प्रथमच, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. ही कसोटी मालिका या उन्हाळ्यात खेळली जाईल. ही मालिका २०२४-२५ च्या देशांतर्गत वेळापत्रकाचं मुख्य आकर्षण असेल.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह यांनी क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं की, बीसीसीआय कसोटी क्रिकेटचा समृद्ध वारसा जपण्यासाठी समर्पित आहे. हे असं स्वरूप आहे ज्याचा आम्ही सर्वात जास्त आदर करतो. बॉर्डर गावस्कर चषक पाच कसोटी सामन्यांपर्यंत वाढवण्यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियासोबतचं आमचं सहकार्य हे कसोटी क्रिकेटचे महत्त्व वाढवण्यासाठी आमची सामूहिक बांधिलकी दर्शवते.या मालिकेतील पहिला कसोटी सामना पर्थमध्ये खेळला जाणार आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे अध्यक्ष माईक बेयर्ड म्हणाले, या दोन देशांमधील तीव्र स्पर्धा पाहता, बॉर्डर गावस्कर ट्रॉफी आता पाच कसोटी सामन्यांपर्यंत करण्यात आल्याचा आम्हाला खूप आनंद आहे.

आतापर्यंत एकूण १६ वेळा बॉर्डर गावस्कर ट्रॉफीचं आयोजन करण्यात आले आहे. यापैकी भारताने १० वेळा ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. तर कांगारू केवळ ५ वेळा हा चषक जिंकला आहे. २००३-०४ मध्ये एकदा ही मालिका अनिर्णित राहिली होती. गेल्या पाच बॉर्डर गावस्कर चषकापैकी भारतानं सलग चार मालिका जिंकल्या आहेत. यापैकी दोन वेळा भारताने ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच घरच्या मैदानावर पराभूत केलं. आता पुन्हा एकदा १७ वी बॉर्डर गावस्कर चषक मालिका २२ नोव्हेंबर ते ७ जानेवारी दरम्यान होणार आहे.

२०२०-२०२१ दरम्यान भारतीय संघ शेवटचा ऑस्ट्रेलियन दौऱ्यावर गेला होता. त्यावेळी दोन्ही संघांमध्ये ४ कसोटी सामने, ३ वनडे आणि ३ टी-२० सामने खेळले गेले होते. कसोटी मालिकेबद्दल बोलायचं झालं तर, पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं ८ गड्यांनी विजय मिळवला होता. दुसऱ्या सामन्यात भारतीय संघानं पुनरागमन करत ८ गडी राखून विजय मिळवला. तिसरा सामना अनिर्णित राहिला. चौथ्या सामना जिंकून ऑस्ट्रेलियाला मालिका जिंकता आली असती, मात्र ऋषभ पंतच्या ऐतिहासिक खेळीमुळे भारताने हा सामना जिंकला.

### ■ बॉर्डर-गावस्कर चषकामध्ये खेळले जाणार पाच सामने

**बॉर्डर गावस्कर मालिकेचं पूर्ण वेळापत्रक**

पहिली कसोटी: २२-२६ नोव्हेंबर, पर्थ
दुसरी कसोटी: ६-१० डिसेंबर, ॲडलेड (दिवस-रात्र कसोटी)
तिसरी कसोटी: १४-१८ डिसेंबर, ब्रिस्बेन
चौथी कसोटी: २६-३० डिसेंबर, मेलबर्न
पाचवी कसोटी: ३-७ जानेवारी, सिडनी

# जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत यश मानेचे उल्लेखनीय यश

**। सोगाव । वार्ताहर ।**

नुकत्याच अलिबाग तालुक्यातील खारेपाटातील बेलपाडा येथे रायगड जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ४० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. तसेच स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती.

या स्पर्धेत मूनवली येथील व्यायाम शाळेचा विद्यार्थी यश पांडुरंग माने याने सहभाग घेत रायगड जिल्ह्यातून १० वा क्रमांक पटकावला तर खारेपाटमधून ५ वा क्रमांक पटकावला. यावेळी यश माने यास मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले होते.



यश माने यांनी कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल तसेच आपल्या मूनवली व्यायाम शाळेचं नाव यशोशिखरावर नेल्याबद्दल मूनवली येथील सचिन घाडी, निकेश अनमाने, अशोक मोंढे, विजय मोरे, केतन नाईक, सुबोध खाडे, नितेश ठकरूळ, अभिषेक जुईकर, अक्षय नागावकर व इतर सहकाऱ्यांसह मूनवली व्यायाम शाळेत जाऊन यश माने याचे कौतुक करत सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

# उदयोन्मुख खेळाडूंना देवधर शिष्यवृत्ती

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

क्रीडामहर्षी प्रा. दि. ब. देवधर यांच्या नावाने देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमुळे चारही उदयोन्मुख खेळाडूंना भविष्यात चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल,असा विश्वास भारताचे माजी क्रिकेटपटू संदीप पाटील यांनी व्यक्त केला.

पीवायसी क्लब आणि प्रा. दि. ब. देवधर परिवाराने ठरविल्याप्रमाणे सलग तिसऱ्या वर्षी हा पुरस्कार सोहळा सोमवारी पार पडला. यावेळी विशेष समारंभात उल्लेखनीय कामगिरीबद्दल वीर कारखानीस, अर्जुन सोनार, यश अधिकारी व अथर्व निमजे या उदयोन्मुख खेळाडूंना क्रीडामहर्षी प्रा. दि. ब. देवधर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

२५ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या शिष्यवृत्तीचे स्वरूप होते. याच बरोबर अमेय देशपांडेला विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पीवायसी क्लबच्या वरिष्ठ संघाचा खेळाडू प्रदीप दाढेने यंदाच्या मोसमात केलेल्या उल्लेखनीय काम गिरीबद्दल सन्मानचिन्ह व अकरा हजार रुपये रोख देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कारांचे वितरण संदीप पाटील यांच्या हस्ते झाले.



## जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

# मरीदेवी धेरंड विजयी

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील धोकवडे येथे प्रथम नितेश कडू फाऊंडेशन धोकवडे आयोजित जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना रायगड जिल्हा संघटक आमिर ठाकूर यांच्या हस्ते व कृष्णा कडवे, दिलिप कडू, धनंजय गुरव, अलिबाग शिवसेना महिला संघटिका स्नेहल देवळेकर, प्रमोद कडू, प्रिती सुबोध कडू, काजल प्रणित कडवे, धोकवडे न. २ ग्रामस्थ, गावदेवी धोकवडे ग्रामस्थ मंडळ, मांडवा जेट्टी मित्रपरिवार व ग्रामस्थ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

स्पर्धेत अंतिम सामना मरीदेवी धेरंड संघ व ओंकार वेश्वी या संघात झाला, यामध्ये अटीतटीच्या लढतीत मरीदेवी धेरंड संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तर ओंकार वेश्वी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. नागेश्वर आवास संघाने तृतीय क्रमांक पटकावला आणि पांडबादेवी रायवाडी संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. यावेळी उत्कृष्ट खेळाडू म्हणून मरीदेवी धेरंड संघाचा ऋतिक पाटील याचा सन्मान करण्यात आला आणि उत्कृष्ट चढाई म्हणून नागेश्वर आवास संघाचा अक्षय कवळे याला सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट पकड म्हणून ओंकार वेश्वी संघाचा मनिष पाटील याचा गौरव करण्यात आला आणि पब्लिक हिरो म्हणून पांडबादेवी रायवाडी संघाचा केदार लाल याला गौरविण्यात आले. या स्पर्धेचे समालोचन धनंजय भगत व संजय पोईलकर यांनी केले.

# आयपीएलचा अंतिम सामना चेन्नईत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीग अर्थात आयपीएलच्या सतराव्या हंगामाची सुरुवात झाली आणि आतापर्यंत ५ सामने खेळवण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने १७ दिवसांचं वेळापत्रक जाहीर केले आहे. यात २१ सामने खेळवले जाणार आहेत.

आता दुसऱ्या टप्प्यातील वेळापत्रक कधी जाहीर होणार याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागलं आहे. बीसीसीआयने आयपीएल २०२४ च्या दुसऱ्या टप्प्यातील वेळपत्रक जवळपास निश्चित केलंय, लवकरच याची घोषणा केली जाणार आहे.

**या मैदानावर प्ले ऑफचे सामने**

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर क्वालिफायर-१ आणि एलिमिनेटरचे सामने आयोजित केले जातील. तर क्वालिफायरचा दुसरा सामना चेन्नईच्या चिदम्बरम स्टेडिअमवर रंगणार आहे. ग्रुप स्टेजमध्ये तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असणाऱ्या संघांमध्ये एलिमिनेटरचा सामना होईल. क्वालिफायर-१ मध्ये हरणारा संघ आणि एलिमिनेटरमधला विजेता संघ क्वालिफाय-२ सामना होईल. यातला क्वालिफायर-१ आणि क्वालिफायर-२ मधले विजेता संघ आयपीएलचा अंतिम सामना खेळतील.**

## पिंगळसई प्रिमिअर लिग

# आई जोगेश्वरी कृपा संघ विजेता



**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे ग्रामस्थ मंडळाच्या वतीने होळी सणाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या पिंगळसई प्रीमिअर लिगचा आई जोगेश्वरी कृपा हा संघ विजेता ठरला आहे.

येथील ग्रामस्थ मंडळ व तरूणाईच्या संकल्पनेने चौथ्या पर्वातील खेळविण्यात आलेल्या व संघ मालक म्हणून जगदीश देशमुख, प्रशांत देशमुख,रविंद्र देशमुख, प्रफुल्ल देशमुख तसेच देविदास देशमुख या संघ मालकांनी पुरस्कृत केलेल्या या स्पर्धेत संघांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील लढती या अटीतटीच्या झाल्या.तर आई जोगेश्वरी कृपा या संघाने स्पर्धेतील आपले वर्चस्व सुरूवातीपासून शेवटपर्यंत कायम राखले. अंतिम सामन्यात देखील या संघाने सर्वोत्तम कामगिरी करून विजेतेपदाचा बहुमान पटकावला. या स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज व मालिकावीर तसेच अंतिम विजेता ठरलेला आई जोगेश्वरी कृपा या संघाला उपस्थित मान्यवरांचे हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# मार्शल लढतीआधी सांगतो विजयी संघाचे नाव

***। मुंबई । वृत्तसंस्था ।***

***आयपीएलच्या १७ व्या हंगामाला २२ मार्च रोजी सुरूवात झाली. सोमवारपर्यंत स्पर्धेत सहा लढती झाल्या. हंगामातील पहिली लढत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात झाली होती. त्यानंतर शनिवारी आणि रविवारी डबल हेडरच्या लढती झाल्या.***



*आयपीएल २०२४मधील पाच पैकी पहिली चेन्नई आणि रविवारी झालेली राजस्थान विरुद्ध लखनौ या दोन लढती वगळता प्रत्येक सामना अखेरच्या षटकापर्यंत रंगतदार झाल्याचे दिसले. आयपीएलच्या सुरुवातीलाच लढती चुरशीच्या होताना दिसत आहेत. प्रत्येक सामन्याच्या आधी चाहते कोणाचा विजय होणार या बद्दल चर्चा करत असतात. फक्त चाहतेच नाही तर माजी खेळाडू देखील त्यांचे फेव्हरेट संघ सांगत असतात.आयपीएलच्या प्रत्येक लढतीआधी जर तुम्हाला त्याचा निकाल कळाला तर? ऐकताना आणि वाचताना थोडे अजब वाटत असेल. पण प्रत्यक्षात असे होत आहे. असे एक ठिकाण आहे जेथे प्रत्येक सामन्याच्या आधी त्यामध्ये कोणाचा विजय होणार हे सांगितले जाते. विशेष म्हणजे सामन्याच्या आधी सांगितला जाणारा अंदाज ९० टक्क्यांहून अधिक वेळा बरोबर आले आहेत. आता इतक सर्व वाचल्यानंतर तुम्हाला देखील उत्सुकता निर्माण झाली असेल की हे सर्व नेमक जाहीर तरी कुठे होते.*

*इंस्टाग्रामवर batnbanters नावाचे एक पेज आहे. या पेजवर आयपीएलच्या प्रत्येक सामन्यातील विजयी संघाची भविष्यवाणी केली जाते. बर ही भविष्यवाणी कोणा एका क्रिकेट तज्ञाकडून किंवा ज्योतषी किंवा न्यूमरोलॉजीस्टकडून केली जात नाही तर मार्शल नावाच्या एका श्वानाकडून केली जाते.मार्शलसमोर दोन चेंडू ठेवले जातात. ज्याच्या कॅमेऱ्याच्या बाजूला त्या दिवशी होणाऱ्या संघांची नावे असलेली पट्टी असते. ही पट्टी मार्शलला दिसत नाही. तो येतो आणि एक चेंडू उचलून घेऊन जातो. जो चेंडू सोडून जातो त्या संघाचा पराभव होण्याची शक्यता, असे व्हिडिओ शूट करणाऱ्यांचा दावा आहे. मार्शलने आतापर्यंत पाच सामन्याचे भविष्य सांगितले. ज्यापैकी ४ मध्ये तो अचूक ठरला. तर एका सामन्याचा त्याने वर्तवलेला अंदाज चुकीचा निघाला.*




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)